# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३०० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २७ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



## मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा

### उद्याला होणार अंत्यसंस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ मुंबई**

भारत सरकारने दु:ख व्यक्त करत भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनाची घोषणा केली आहे. त्यांचे निधन २६ डिसेंबर २०२४ रोजी नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात झाले.

डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे भारत सरकारने सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा पाळण्याचा निर्णय घेतला आहे. हा दुखवटा २६ डिसेंबर २०२४ पासून १ जानेवारी २०२५ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) पाळला जाईल. या



काळात राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवला जाईल आणि कोणतेही शासकीय मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत.डॉ. मनमोहन सिंग यांचे शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात येणार आहे.

तसेच, त्यांच्या अंतिम संस्काराच्या दिवशी देश-विदेशातील सर्व भारतीय दूतावासांमध्येही राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवण्यात येईल.

**मनमोहन सिंग यांच्यावर उद्या सकाळी १० वाजता होणार अंत्यसंस्कार**

देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यावर शनिवारी, २८ डिसेंबरला शासकीय इतमामात अंतिम संस्कार होणार असल्याची माहिती समोर आली आहे. पंतु, याबाबतची कोणतीही अधिकृत घोषणा अद्यापही करण्यात आलेली नाही. देशाच्या माजी पंतप्रधानांचे अंत्यसंस्कार दिल्लीतील विशेष स्मारक स्थळांवर केले जातात. माजी पंतप्रधानांचे अंत्यसंस्कार सहसा दिल्लीत होतात. काही वेळा अंत्यसंस्कार गृहराज्यातही होऊ शकतात. एका वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे पार्थिव उद्या शनिवारी, २८ डिसेंबर रोजी काँग्रेस मुख्यालयात आणले जाईल, जिथे लोक त्यांना श्रद्धांजली वाहतील. त्यानंतर त्यांच्या पार्थिवावर राजघाटाजवळ अंत्यसंस्कार करण्यात येणार येतील, अशी माहिती आहे.

## चलनी नोटेवर स्वाक्षरी असणारे एकमेव पंतप्रधान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नवी दिल्ली**

प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे गुरुवारी रात्री दिल्लीतील एम्स रुग्णालयात निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाबद्दल देशात सात दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असून उद्या त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत. ते देशाचे एकमेव पंतप्रधान आहेत की, ज्यांची स्वाक्षरी चलनी नोटेवर होती.

भारतात १९९१मध्ये झालेल्या ऐतिहासिक आर्थिक सुधारणांचे श्रेय अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांना दिले जाते. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या कार्यकाळात ते अर्थमंत्री होते आणि त्यांनी केलेल्या सुधारणांमुळे भारतीय



अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. मनमोहन सिंग यांनी जेव्हा अर्थमंत्रालयाची सूत्रे हाती घेतली तेव्हा भारताची वित्तीय तूट सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) ८.५ टक्क्यांच्या जवळपास होती. याशिवाय, अत्यावश्यक आयातींसाठी देशाकडे फक्त दोन आठवडे पुरेल इतकेच परकीय चलन होते. यावरून देशाची अर्थव्यवस्था त्यावेळी गंभीर संकटात होती, हे स्पष्ट होते.

अशा स्थितीत १९९१-९२च्या केंद्रीय अर्थसंकल्पाद्वारे डॉ. मनमोहन सिंग यांनी देशात एका नव्या आर्थिक युगाची सुरुवात केली. स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातील हा एक महत्त्वाचा टर्निंग पॉइंट होता. या बजेटमध्ये धाडसी आर्थिक सुधारणा, परवाना राज रद्द करणे आणि खासगी तसेच परदेशी कंपन्यांसाठी अनेक क्षेत्रे खुली करणे अशा निर्णयांचा समावेश होता.

तत्पूर्वी, मनमोहन सिंग हे १६ सप्टेंबर १९८२ ते १४ जानेवारी १९८५ या कालावधीत रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते. भारतीय चलनावर राष्ट्रपती आणि पंतप्रधानांची स्वाक्षरी नसते तर, आरबीआय गव्हर्नरची स्वाक्षरी असते. त्यामुळे या काळात छापण्यात आलेल्या चलनी नोटांवर त्यांची स्वाक्षरी असायची. नंतर २००४मध्ये ते देशाचे पंतप्रधान झाले. सन २०१४पर्यंत ते या पदावर होते. अशा रीतीने भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर ते पंतप्रधान अशी अनेक महत्त्वाची पदे डॉ. मनमोहन सिंग यांनी भूषविली. म्हणूनच, भारतीय चलनावर स्वाक्षरी असलेले डॉ. मनमोहन सिंग हे एकमेव पंतप्रधान ठरले.

## मनमोहन सिंग यांनी न बोलता, शांतपणे करुन दाखवले ते अनेकांना बोलून करता आले नाही : राज ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ मुंबई**

देशाच्या अर्थव्यवस्थेला कलाटणी देणारे तसेच जागतिक अर्थव्यवस्थेत भारताला नवीन उंची मिळवून देणारे माजी पंतप्रधान तसेच ख्यातनाम अर्थतज्ञ डॉ. मनमोहन सिंग हे वयाच्या ९२व्या वर्षी गुरुवारी रात्री कालवश झाले. त्यांच्या निधनामुळे देशाने एक अर्थऋषी गमावला आहे. मनमोहन सिंग यांच्यावर पूर्ण शासकीय इतमामात



अंत्यसंस्कार केले जातील व सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा पाळला जाईल. प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना दिल्लीतील एम्स रुग्णालयातील अतिदक्षता विभागात त्यांना दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. देशभरातून मनमोहन सिंग यांना आदरांजली वाहिली जात आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहिली.

एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये राज ठाकरे म्हणतात की, भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचं निधन झाले. १९९१ ला जेंव्हा मनमोहन सिंग देशाचे अर्थमंत्री झाले तेंव्हा देशाची अर्थव्यवस्था अतिशय तोळामासाची होती. एका बाजूला बर्लिन भिंत कोसळली होती आणि शीतयुद्धाचा शेवट झाला होता, साम्यवादी चीनच्या आर्थिक ताकदीची चुणूक दिसायला लागली होती. अशावेळेस भारतीय उद्योगांच्या पायात आधीच्या काँग्रेसच्या सरकारांनी ज्या बेड्या घातल्या होत्या, त्या तोडून काढण्याचे काम डॉ. मनमोहन सिंग यांनी उदारीकरणाचे धोरण स्वीकारून केले. अर्थात नरसिंहरावांसारख्या पंतप्रधानाची साथ त्यांना लाभली हे देखील खरे, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

## सामान्यांना दिलासा मिळणार? अर्थसंकल्पात १५ लाखांपर्यंतच्या रकमेवर सरकार कर कमी करण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७नवी दिल्ली**

केंद्र सरकार आगामी अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये १५ लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावरील आयकरात कपात करू शकते, ज्यामुळे मध्यमवर्गाला दिलासा मिळण्याची शक्यता आहे आणि अर्थव्यवस्थेतील मागणी वाढविण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलले जाईल. रॉयटर्सने दोन सरकारी सूत्रांच्या हवाल्यानं ही माहिती दिली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अलीकडे



मंदावलेल्या आर्थिक विकासाला गती देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

मात्र, आयकर कपातीच्या आकाराबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसून १ फेब्रुवारी २०२५ रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाच्या सादरीकरणापूर्वीच त्याचा आकार निश्चित केला जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच NITI आयोग येथे प्रमुख अर्थतज्ज्ञ आणि प्रादेशिक तज्ज्ञांची बैठक घेतली. ज्यामध्ये त्यांनी आगामी अर्थसंकल्पासाठी त्यांच्या कल्पना आणि सूचनांवर चर्चा केली. या बैठकीत तज्ज्ञांनी आयकर दरात कपात, सीमाशुल्क दर सुधारणं आणि निर्यातीला चालना देण्यासाठी सरकारकडे प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन १ फेब्रुवारी २०२५ रोजी लोकसभेत अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

**आयकर कायद्याचा सर्वंकष आढावा**

गेल्या अर्थसंकल्प २०२४-२५ मध्ये अर्थमंत्र्यांनी आयकर कायद्याचा सर्वंकष आढावा घेण्याची घोषणा केली होती, त्यानंतर आयकर विभागाचे प्रमुख व्ही.के. गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. ही समिती २०२५-२६ च्या अर्थसंकल्पापूर्वी आपला अहवाल सादर करणार आहे. नव्या आयकर कायद्याची अंमलबजावणी पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशनात होणार नाही आणि तो अंमलात येण्यासाठी वर्षभराहून अधिक कालावधी लागेल, असं एका सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितलं.

## एकाच व्यक्तीच्या नावावर ९०० कोटी रुपयांचे व्यवहार

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २७ बीड**

बीडच्या मस्साजोगमधील सरपंच, संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे राज्यातील राजकारण तापले आहे. आष्टीचे भाजप आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण चांगलेच उचलून धरले असून, सातत्याने धनंजय मुंडेंवर निशाणा साधत आहेत. अशातच, आता धस यांनी एका मोठ्या घोटाळ्याचा खुलासा केला आहे. बीडच्या टेंभूर्णी गावातील एका व्यक्तीच्या नावावर ९ अब्ज रुपयांचे व्यवहार झाल्याचा खळबळजनक दावा सुरेश धस यांनी आज केला.

## संदीप क्षीरसागरांनी धनंजय मुंडेंना दिलं थेट चॅलेंज

### वाल्मिक कराडला धनंजय मुंडे यांनी पोलिसांकडे सुपूर्द करावे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७बीड**

पवनचक्कीच्या अधिकाऱ्याला खंडणी मागितल्याप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराडवर खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. मात्र, अद्यापही वाल्मिक कराड पोलिसांच्या हाती लागला नाही. दुसरीकडे सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणातही वाल्मिक कराडचा हात असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. मात्र, वाल्मिक कराडला धनंजय मुंडे यांनी पोलिसांकडे सुपूर्द करावं, असं आव्हान राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरदचंद्र पवार ) आमदार संदीप क्षीरसागर यांनी दिलं आहे.



पोलीस वाल्मिक कराडला अटक का करत नाही? धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा. जोपर्यंत धनंजय मुंडे राजीनामा देणार नाहीत, तोपर्यंत हा आक्रोश कमी होणार नाही, असं क्षीरसागर यांनी म्हटलं आहे. ते एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधत होते.संदीप क्षीरसागर म्हणाले, मी पहिल्यांदा वाल्मिक कराडचं नाव घेतलं आणि पोलिसांच्या 'सीडीआर'मध्ये सुद्धा वाल्मिक कराडचे नाव आहे. मग वाल्मिक कराडला अटक का करत नाहीत? असा सवाल क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

आम्ही संतोष देशमुख प्रकरणाचं राजकारण कधीच केले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा तातडीनं याप्रकरणाचा तपास लावण्याची घोषणा केली. हे प्रकरण राजकीय नाही, तर गुन्हेगारीचं आहे. १८ दिवस झाले, तरी वाल्मिक कराड पोलिसांना सापडत नाही. त्यामुळे धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा. जोपर्यंत धनंजय मुंडे राजीनामा देणार नाहीत, तोपर्यंत हा आक्रोश कमी होणार नाही, असं संदीप क्षीरसागर यांनी म्हटलं आहे.

## राजकोट किल्ल्यावर पुन्हा उभारणार महाराजांचा दिमाखदार पुतळा, किती असेल उंची?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंधुदुर्ग मालवणमधील पुतळा काही दिवसांपूर्वी कोसळला होता. जो पुतळा पडला तो केवळ ८ महिन्यांपूर्वी उभारण्यात आला होता. हा महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर सरकारच्या विरोधात समाजातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. विरोधकांनी यावरून टीका करत सरकारला चांगलंच घेरलं होतं. त्याचबरोबर सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला होता. मात्र या टीकेला सरकार जोरदार उत्तर म्हणून लवकरच दिमाखदार पुतळा उभारण्याच्या तयारीत आहे.




महाराजांच्या पुतळ्याच्या कामाला सुरुवात : छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडला त्यानंतर त्याठिकाणी नवीन भव्यदिव्य पुतळा उभारू असं महायुती सरकारनं आश्वासन दिलं होतं. त्यामुळं आता पुतळ्याच्या चौथऱ्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. हा पुतळा किती फूट उंच असणार? पुतळ्याचं वैशिष्ट्य काय? पुतळ्याचं कशा प्रकारे काम होणार? पुतळा कोण तयार करणार? असे प्रश्न यानिमित्तानं उपस्थित केले जात आहेत.

अनिल राम सुतार पुढे म्हणाले, शिवाजी महाराज यांचा पुतळा हा आधीपेक्षा मोठा असेल. जो पुतळा पडला तो २२ फूटांचा होता. नवीन पुतळा ६० फुटाचा करायला सांगितला आहे. पुतळ्याची आणि तलवारीची उंची पाहता पुतळ्याची एकूण उंची ही ७५ फूट असणार आहे. या पुतळ्यासाठीचा चबुतरा १० फुटांचा असणार आहे. आमच्या हाती आताच काम सुपूर्द केलं आहे. पूर्वीचा चबुतरा आणि पुतळा काढला आहे. मार्च २०२५ पर्यंत नवीन पुतळ्याचं काम पूर्ण होईल. आमचं सौभाग्य आहे की, आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचं काम करायला मिळत आहे. आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा देखील १२५ फूटांचा पुतळा हैदराबाद येथे करून दिला आहे. तर आता मुंबईसाठी ३५० फुटांचा पुतळा करणार असल्याची माहिती शिल्पकार अनिल राम सुतार यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्याची पूर्तता करा, राजू शेट्टींची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७कोल्हापूर**

विधानसभेच्या निवडणुकीत महायुती सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. त्याची पूर्तता राज्य सरकारने तातडीने करावी. दिलेला शब्द पूर्ण करावा. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करून द्यावा, त्यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने १ जानेवारी रोजी निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी दिली.

राजू शेट्टी म्हणाले, स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची पुणे येथे २५ डिसेंबर रोजी बैठक झाली. या बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. मागील पाच वर्षांत केंद्र सरकारच्या धोरणामुळे शेतकरी रसातळाला गेला आहे. त्यातच सोयाबीन, कापूस, तूर, दूध, साखर, डाळी, आदींच्या पडलेल्या दरामुळे शेतकरी मातीमोल झाला आहे. उत्पादन खर्चापेक्षा कमी किमतीत शेतकऱ्यांना आपला शेतीमाल विकावा लागत आहे. रासायनिक



खतांच्या किमतीत भरमसाट वाढ झालेली आहे. डी.ए.पी.मध्ये पुन्हा २५० रुपयांची वाढ झालेली आहे. कीटकनाशके, तणनाशकांच्या किमतीत मोठी वाढ झालेली आहे. सरकार हमीभाव जाहीर करते; पण हमीभावाचा कायदा अस्तित्वात नसल्याने शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी किमतीत शेतीमाल विकावा लागत आहे.

परिणामी गेल्या पाच वर्षांत शेतकऱ्यांचे कर्ज हे दुप्पट झालेले आहे. एका बाजूला केंद्र सरकार देशातील कॉर्पोरेट कंपन्यांच्या १० लाख कोटींच्या कर्जाचा निर्णय घेत नाही. ते कर्ज राईट ऑफ करत आहे. दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांचे कर्ज दुप्पट होते. ही अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे. महायुती सरकारला शेतकऱ्यांनी भरभरून मते दिलेली आहेत.राज्यात रामराज्य आले असल्याचे महायुतीचे नेते सांगत आहेत. राज्य सरकारने आपला दिलेला शब्द पाळावा, म्हणून राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी, शेतकरी १ जानेवारीला जाऊन सरकारने दिलेल्या शब्दांची आठवण करून देतील. मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन मी स्वतः याबाबत आठवण करून देणार आहे. त्यानंतरही सरकारने आमची दखल घेतली नाही तर राज्यव्यापी मोठ्या आंदोलनाची घोषणा केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

## संपादकीय ......

# चर्चेतील चेहरा: करीना थापा

*आपल्या देशात लहान वयातच धैर्य आणि प्रसंगावधान राखून इतरांचे प्राण वाचवणारे अनेक लहान मुलं-मुली आहेत. अशा अनेक मुलांना आतापर्यंत राष्ट्रीय शौर्य पुरस्कारही मिळालेले आहेत. आता अशीच एक सतरा वर्षांची मुलगी ७० कुटुंबांचे प्राण वाचवल्यामुळे देशभरात चर्चेत आली आहे. अमरावतीच्या करीना थापा या मुलीने एका अपार्टमेंटमध्ये लागलेल्या भीषण आगीवेळी प्रसंगावधान राखून व धाडस दाखवून अनेकांचे प्राण वाचवले. आता तिला गुरुवारी म्हणजेच २६ डिसेंबरला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात केंद्रीय महिला व बाल कल्याण मंत्रालयाद्वारे दिल्या जाणार्या प्रतिष्ठित 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येईल.*

*१५ मे २०२४ या दिवशी सायंकाळी अमरावतीच्या कठोरा रोडवर असलेल्या पोद्दार इंटरनॅशनल स्कूलजवळील जय अंबा अपार्टमेंटच्या बी विंगमधील दुसर्या मजल्यावरील एका फ्लॅटमधून धूर येऊ लागला. त्यामुळे उडालेल्या गोंधळात घरकाम करणार्या करीनाने बंद असलेल्या शेजारच्या फ्लॅटमध्ये घुसून, धुराचे लोट आणि आगीच्या ज्वालांचा सामना करीत गॅस सिलिंडरजवळ लागलेली आग आटोक्यात आणली. तिने बादलीतून पाणी घेऊन सिलिंडरच्या चारही बाजूला लागलेली आग नियंत्रित केली आणि सिलिंडर बाहेर काढले. त्यामुळे सिलिंडरचा स्फोट होऊन आग भडकण्याची आणि दुर्घटनेची व्याप्ती वाढण्याची भीती दूर झाली. करीनाचे हे धाडस आणि प्रसंगावधान अपार्टमेंटमधील ७० कुटुंबांचे प्राण वाचवणारे ठरले. घटनास्थळी अग्निशमन दल पोहोचण्यापूर्वीच करीनाने हे सिलिंडर बाहेर काढून मोठाच अनर्थ टाळला. त्यानंतर अग्निशमन दलाने येऊन आगीवर नियंत्रण मिळवले व सर्व रहिवाशांनी सुटकेचा श्वास घेतला!*

*अपार्टमेंटचे केअर टेकर असलेले अशोक थापा यांची करीना ही कन्या. पत्नी आणि दोन मुलींसह केअरटेकर म्हणून जबाबदारी सांभाळणार्या मूळच्या नेपाळमधील अशोक थापा यांच्या कुटुंबीयांनी या अपार्टमेंटलाच आपले घर मानले आहे. अमरावतीतच अकरावीचे शिक्षण घेत असलेली करीना आपल्या आईला मदत म्हणून अपार्टमेंटमध्ये घरकाम करते. फ्लॅटमधून धूर निघत असल्याचे दिसताच तिने आधी फ्लॅटचे दार ठोठावले. कुलूप असल्याने आतून प्रतिसाद मिळत नसल्याचे पाहताच तिने लगेचच वडिलांना घटनेची माहिती दिली. मात्र, या संकटाच्या काळात आपणच तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे, असे तिला वाटले. एव्हाना फ्लॅटला आग लागली. ती आग तत्काळ विझवण्यासाठी तिने फ्लॅटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. आग व धुराचे लोट येत असतानाही एका व्यक्तीच्या मदतीने तिने बादलीतून पाण्याचा मारा करीत सिलिंडरजवळील आग पूर्णपणे आटोक्यात आणून सिलिंडर बाहेर काढले. वडिलांचे कार्य एका अर्थी या लेकीने आपलीच जबाबदारी आहे असे जाणून पार पाडले. ती खर्या अर्थाने वडिलांप्रमाणेच अपार्टमेंटची 'केअरटेकर' बनली! आता या वीर कन्येला राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित केले जाणार आहे.*

# असरदार सरदार डॉ. मनमोहन सिंग ...

डॉ.मनमोहन सिंग गेले हे ऐकून मनाला वेदना झाल्यात, दु:ख झालं.देशाला दिशा देणारे कुशल नेतृत्व म्हणुन त्यांची सदैव आठवण येत राहील, आमची पिढी तर त्यांचे उपकार कधीही विसरणार नाही,आज जो डिजिटल भारत उभा आहे त्याचे जनक डॉ मनमोहन सिंग आहेत.स्व. राजीव गांधी यांनी जी आधुनिक भारताची मुहूर्तमेढ रोवली होती त्याला मुर्त स्वरूपात आणण्याचे काम डॉ. मनमोहन सिंग यांनी केले.

ज्याकाळात आपला देश आर्थिक संकटात होता, आपल्या देशाला सोनं गहाण ठेवायची परिस्थिती निर्माण झाली होती अश्या बिकट कळात डॉ. मनमोहन सिंग यांनी रिझर्व बँकेचे गव्हर्नर आणि त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान नरसिंगराव यांच्या सरकारमध्ये अर्थमंत्री म्हणुन काम केले,नुसते काम केले नाहीतर ह्या देशाला नवीन ओळख दिली.आज आपला देश जो आर्थिक महासत्ता म्हणुन आगेकुच करत आहे ना याचे सर्वाधिक श्रेय डॉ मनमोहन सिंग यांना जाते.

डॉ. मनमोहन सिंग हे व्यावसायिक राजकारणी नव्हते किंवा त्यांचा पिंड राजकीय नव्हता मात्र त्यांच्या ज्ञानाचा देशाला उपयोग व्हावा म्हणुन, त्यांना राजकारणात आणले गेले. त्यांनीही देशवासियांना निराश केले नाही.

स्व. अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असतांना ते राज्यसभेत विरोधी पक्षनेते होते, तेव्हा त्यांच्या अनेक सुचना अटल बिहारी वाजपेयी ऐकत असत,कधी कधी तर त्यावर




अंमल देखील करत,तेव्हा आजच्या सारखी परिस्थिती नव्हती आज पंतप्रधान सभागृहात कमी आणि बाहेर जास्त वेळ देतात.सन २००४ साली भाजपच पुन्हा सत्तेत येणार असे वातावरण असतांना अचानक काँग्रेस पक्षाला म्हणजेच संयुक्त पुरोगामी आघाडीला बहुमत मिळाले आणि श्रीमती सोनिया गांधी यांनी आपल्या पदरचे पंतप्रधान पद डॉ. मनमोहन सिंग यांच्या झोळीत टाकले. अशाप्रकारे डॉ.मनमोहन सिंग पर्वाला सुरवात झाली आणि हे पर्व ऐतिहासिक ठरले.त्याचे उदाहरण म्हणजे भारत - अमेरिका अणुकरार,प्रसंगी सत्ता गेली तरी चालेल मात्र भारत - अमेरिका अणुकरार झाल्याच पाहिजे अशी आक्रमक भूमिका डॉ. सिंग यांनी घेतली, सत्तेपेक्षा देश महत्वाचा हे त्यांनी कृतीतून दाखवून दिलं. माना कि तेरे दिद के काबील नहीं हूं मै, तु मेरा इंतजार तो देख, तु मेरा शौक तो देख* सरदार डॉ. मनमोहन सिंग हे फार कमी बोलायचे मात्र जे बोलायचे ते फार मौल्यवान बोलायचे, ते कधी कधी शेरोशायरी सुद्धा करायचे. त्यांच्या काळात अनेक क्रांती घडवणारे निर्णय घेण्यात आले, त्यातील आधार कार्ड योजना. जी आज देशातील नागरिकांना वेगवेगळ्या सुविधा घेण्यासाठी फारच उपयोगी पडत आहे.महात्मा गांधी रोजगार हमी योजना, अन्नसुरक्षा विधेयक, शेतकऱ्यांना ७२ हजार कोटीची कर्जमाफी हे निर्णय तर मास्टर स्ट्रोक होते त्यांच्या कारकिर्दीत.सन २००८ साली संपूर्ण जग आर्थिक मंदित असताना भारत हा एकमेव देश होता ज्याला या आर्थिक मंदीची झळ पोहचली नाही कारण देश डॉ मनमोहन सिंग यांच्या सारख्या जागतिक किर्तीच्या अर्थतज्ञाच्या हाथात होता आणि तो हाथ खरोखरचं मजबुत होता.आजच्या सारख्या खोगिर नेत्यांच्या हाथात नाही.

डॉ. मनमोहन सिंग यांनी दोनदा देशाचे पंतप्रधान पद भूषवले. त्यांची पहिली इनिंग अत्यंत यशस्वी झाल्यावर दुसरी इनिंग वादग्रस्त ठरली, जे घोटाळे झालेच नाही अश्या घोट्याळ्यावर चर्चा घडली, यातील सर्वात जास्त गाजलेले प्रकरण म्हणजे दुरसंचार घोटाळा,कोळसा घोटाळा,यात डॉ मनमोहन सिंग सरकारची पुरती शोभा झाली. त्यानंतर दिल्ली मधील अण्णा हजारे यांचे आंदोलन *(जे नंतर कळले कि विशिष्ट लोकांनी स्पॉन्सर केले होते) त्यांच्या कारकिर्दीला घातक ठरले आणि डॉ.मनमोहन सिंग युगाचा २०१४ साली अंत झाला तसेच देश एका चांगल्या पर्वाला मुकला.

डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर विरोधकांनी वैयक्तिक टीका केली, टीका करताना त्यांना भान राहत नव्हते, एवढेच काय तर त्यांची शबी नकारात्मक करण्यासाठी चित्रपट देखील काढला, मात्र विरोधक हे विसरले होते कि हाथी चले बाजार - कुत्ते भोंके हजार जन माणसात डॉ. मनमोहन सिंग यांचे स्थान तेव्हाही आणि आजही तेवढेच मोलाचे होते आणि राहील.

डॉ. मनमोहन सिंग आज गेले ते त्यांच्या उज्वल कारकिर्दीचा ठसा उमटून.पहिले शीख पंतप्रधान, पाकिस्तान मधुन भारतात आलेले निर्वासित ,स्वातंत्र्य पुर्व काळात जन्मलेले आणि पंतप्रधान झालेले शेवटचे व्यक्ती,बालवयातच मातृ प्रेम हरवलेले.इतिहास माझ्यावर कधीही अन्याय करणार नाही, माझ्या देशासाठी जे जे मला करता आले ते मी सर्व केले ही त्यांची भावना देशाला - पुढील पिढीला कायमच प्रेरणा देत राहील.

*हजारो जबाबोसे अच्छी है मेरी खामोशी,न जाणे कितने सवालो कि आब्रु रखी.

**भावपुर्ण श्रद्धांजली.!**

**- नितीन पवित्रकार,**
**अमरावती- ९६६५३०९५८१**

# मातीतील सेंद्रिय कर्ब कशामुळे कमी होतो? व तो कसा वाढवावा; सविस्तर वाचा

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक**

जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी असेल तर आपण दिलेली अन्नद्रव्ये मोठ्या प्रमाणात तशीच राहतात. याउलट सेंद्रिय कर्बाचे प्रमाण जितके जास्त असेल तितकी जमिनीची सुपीकता चांगली राहते.

सेंद्रिय कर्बाचे प्रमाण आदर्श असेल तर आपण दिलेल्या सेंद्रिय व रासायनिक स्वरूपातील मुख्य व दुय्यम अन्नद्रव्ये यांची उपयोगिता वाढून ती पिकांना मोठ्या प्रमाणात घेता येतील.सेंद्रिय कर्ब हे जमिनीच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. सेंद्रिय कर्ब हे मातीतील पिकांच्या वाढीसाठी झटणाऱ्या जिवाणूंचे खाद्य आहे. जमिनीत जर सेंद्रिय कर्ब जास्त असेल तर जमिनीत पाणी मुरून ओलावा टिकून राहतो व माती भुसभुशीत राहते.

जमिनीच्या रासायनिक, जैविक व भौतिक गुणधर्मामध्ये सुधारणा होते. सेंद्रिय पदार्थ मातीच्या वस्तुमानापैकी केवळ २ ते १० टक्के एवढ्याच प्रमाणात असतात. सेंद्रिय पदार्थातील कर्ब जमिनीतील अन्नद्रव्ये टिकवून ठेवण्यासाठी व पिकांना अन्नद्रव्ये उपलब्ध होण्यासाठी अत्यंत महत्वाचा घटक आहे.

मातीची जडण घडण, पाण्याची उपलब्धता, पाणी मातीत टिकवून ठेवण्याची क्षमता, मातीची लवचिकता व मातीतील प्रदुषकांचे विघटन तसेच सेंद्रिय कर्ब हे मातीत असलेल्या असंख्य सूक्ष्म जीवांचे अन्न पण आहे.

सेंद्रिय कर्ब कमी का होतो ?

आपल्याकडे असलेल्या जास्त तापमानामुळे सेंद्रिय कर्बाचे ऑक्सिडेशन होते. म्हणजे सूर्याची प्रखर उष्णता व प्राणवायूमुळे सेंद्रिय कर्बाचे ज्वलन होते.

आपल्याकडे असलेल्या भौगोलिक परिस्थितीमुळे आपल्या जमिनीत सेंद्रिय कर्बाची मात्रा अत्यंत कमी ०.२ टक्के पासून ते जास्तीत जास्त ०.६ टक्क्यांपर्यंत आहे.




**सेंद्रिय कर्ब वाढविण्याचे उपाय**

सेंद्रिय खताचा जास्तीत जास्त वापर करावा.

पिकांचे अवशेषांचे आच्छादन म्हणून वापर करावा.

पिकांचे अवशेष न जाळता जमिनीत गाडावे.

पीक पद्धती व आंतरपीकमध्ये कडधान्य पिकांचा समावेश करावा.

हिरवळीचे पीक धैंचा किंवा बोरू जमिनीत गाडावा.

मृद व जल संधारण करून जमिनीची धूप टाळावी.

वखराच्या शेवटच्या पाळी अगोदर सेंद्रिय किंवा कंपोस्ट खताचा वापर करावा.

जैविक खताचा वापर वाढवावा व तसेच त्यांचा वापर शेणखतात मिसळून व बीजप्रक्रियेसाठी करावा.

खतांची मात्रा संतुलित, योग्य वेळी व योग्य प्रकारे द्यावी.

कात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा वापर करावा.

**जैविक गुणधर्मात सुधारणा**

जमिनीतील सूक्ष्म जीवाणू मुख्यत: सेंद्रिय पदार्थ कुजविण्याचे व पिकाला अन्न पुरवठा करण्याचे काम करतात.

यातील पहिला गट जमिनीला सुपीकता देत असतो तर दुसरा पिकाला पोषण पुरविण्यात (अन्न पोषणात जीवाणू अ‍ॅक्टीनोमायसीट्स व बुरशीच्या अनेक जाती प्रजाती) कार्यरत असतो.

सेंद्रिय पदार्थ कुजविण्याच्या क्रियेतून अनेक सेंद्रिय आम्ल, संजीवके व वाढ वृद्धिंगत करणारे पदार्थ तयार होत असतात.

जमिनीतील वेगवेगळ्या प्रकारच्या जिवाणूंना सेंद्रिय कर्बाद्वारे ऊर्जा पुरविली जाते त्यामुळे कार्यक्षमता चांगली होऊन अन्नद्रव्याची उपलब्धता वाढते.




## पायऱ्या चढण्या-उतरण्याचे मिळतात एकापेक्षा एक फायदे, जिममध्ये जाण्याची पडणार नाही गरज!

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**

आजकाल बऱ्याच लोकांकडे एक्सरसाईज करण्यासाठी वेळ नसतो किंवा त्यांची ईच्छा नसते. तसेच काही लोक कामाच्या वाढत्या ताणामुळे फिटनेसची योग्य ती काळजी घेत नाहीत. अशात आम्ही तुम्हाला एक सोपा उपाय सांगणार आहोत. ज्याद्वारे तुम्ही फिटही राहू शकता आणि सोबतच हृदयरोग, ब्लड प्रेशर कंट्रोल आणि डायबिटीसचा धोकाही कमी करू शकता. हा उपाय म्हणजे पायऱ्या चढणं-उतरणं. १० मिनिटे पायऱ्या चढणं-उतरणं केलं तर तुम्हाला अनेक फायदे मिळू शकतात.




**१० मिनिटं पायऱ्या चढा-उतरा**

जर तुमच्याकडे जिममध्ये जाऊन अर्धा तास कार्डिओ एक्सरसाईज करण्याचा वेळ नसेल तर तुम्ही तुमच्या घरात १० ते १५ मिनिटं हाय इन्टेन्सिटीने पायऱ्या चढूनही कॅलरी बर्न करू शकता. ही एक अशी एक्सरसाईज आहे, ज्यासाठी फार वेळही लागत नाही आणि यानं वेगानं कॅलरी बर्नही होतात. पायऱ्या चढल्यानं मांड्या, पोट आणि पायांच्या मांसपेशी मजबूत होतात. सोबत फॅट बर्नही होतं.

**हृदयासाठी फायदेशीर**

एक्सपर्टनुसार, पायऱ्या चढल्यानं ब्लड सर्कुलेशन चांगलं होतं आणि सोबतच गुड कोलेस्टेरॉलचं प्रमाणही शरीरात वाढतं. ज्यामुळे हृदयाचं आरोग्य चांगलं राहण्यास मदत मिळेल.

**मानसिक आरोग्य चांगलं राहतं**- पायऱ्या चढणं आणि उतरणं ही एक हाय इन्टेन्सिटी एक्सरसाईज असते आणि कोणतीही फिजिकल एक्सरसाईज केल्यानं मेंदुमध्ये हॅप्पी हार्मोन रिलीज होतात व मडू चांगला राहतो.

**डायबिटीस कंट्रोल**

पायऱ्या चढणं आणि उतरण्यानं ब्लड शुगर लेव्हल कंट्रोल राहते आणि याने मेटाबॉलिज्म वाढतं. ज्यामुळे डायबिटीसचा धोका कमी केला जाऊ शकतो.

**फफ्फुसांसाठी फायदेशीर**

पायऱ्या चढणं-उतरणं केल्यानं फुफ्फुसांची क्षमता वाढते आणि श्वसन तंत्रही चांगलं राहतं. ज्यामुळे श्वसनांसंबंधी समस्याही होत नाहीत. इतकंच नाही तर पायऱ्या चढल्या-उतरल्यानं एनर्जी लेव्हलही वाढते आणि थकवा दूर होतो.

# भाऊसाहेब देशमुख यांचा जयंती उत्सव मुख्य सोहळा कार्यक्रम रद्द

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२७अमरावती** - माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे निधन झाल्याने श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित भाऊसाहेब देशमुख यांचा जयंती उत्सवाचा मुख्य सोहळा कार्यक्रम रद्द करण्यात आलेला आहे.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच



खासदार सुप्रिया सुळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार होती, परंतु रात्री दहाच्या सुमारास देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे निधन झाले. त्यामुळे श्री शिवाजी शिक्षण संस्थेने आयोजित केलेला जयंती उत्सवाचा मुख्य सोहळा रद्द केला आहे, अशी माहिती श्री शिवाजी शिक्षण संस्थेकडून देण्यात आलेली आहे. जयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेले इतरही कार्यक्रम रद्द करण्यात आले असून केवळ भाऊसाहेब देशमुख यांच्या आदरांजलीचा कार्यक्रम सकाळी आठ ते नऊ यादरम्यान होईल, असे कळविण्यात आले

# आयुष्मान योजनेच्या लाभार्थ्यांकडून आरोग्यमित्राचा सत्कार

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२७अकोला,-** प्रधानमंत्री आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी आरोग्य मित्र कार्य करतात. जिल्ह्यातील आरोग्यमित्र सिद्धार्थ सुधाकर इंगोले यांनी रूग्णांना केलेले योग्य मार्गदर्शन व आपुलकीची वागणूक यामुळे संबंधित रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी त्यांचा सत्कार केला.

योजनेचे लाभार्थी रुग्ण आत्माराम जाधव व त्यांचे नातेवाईक यांनी पुष्पगुच्छ देऊन आरोग्यमित्र श्री. इंगोले यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सद्य:स्थितीमध्ये जिल्ह्यामध्ये एकूण २९ रुग्णालय योजनेमध्ये जनसेवा देत आहेत. त्यापैकी ८ शासकीय व २१ खाजगी रुग्णालये आहेत. एक एप्रिल २०२० पासून जिल्ह्यामध्ये ४३ हजार ६२५ एवढ्या रुग्णांनी योजनेचा लाभ घेतला आहे. त्यासाठी २०६. २१ कोटी एवढा खर्च शासनाने केला आहे. केंद्र व राज्य सरकारच्या या महत्वाकांक्षी योजनेचा सर्वसामान्य जनतेला लाभ व्हावा यासाठी एमडी इंडिया ही कंपनी अकोला जिल्ह्यात कार्यरत आहे प्रकल्पप्रमुख डॉ. नारायण राठोड,

डॉ अनुज गुप्ते, विभागीय व्यवस्थापक सुनील वाठोरे, जिल्हा व्यवस्थापक डॉ शीतल गावंडे, क्लस्टर हेड गजानन पांडे, जिल्हा प्रकल्पप्रमुख डॉ. नागेंद्र वाघ,डॉ आनंद चाकोटे, श्याम फाले यांनी सिद्धार्थ इंगोले यांचे कौतुक केले आहे.



RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २७ डिसेंबर २०२४ शहर/ग्रामिण

# अर्थऋषी कालवश; आर्थिक सुधारणांचे जनक डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन

## ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा, दिल्लीत एम्स रुग्णालयात घेतला अखेरचा श्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७नवी दिल्ली –** देशाच्या अर्थव्यवस्थेला कलाटणी देणारे तसेच जागतिक अर्थव्यवस्थेत भारताला नवीन उंची मिळवून देणारे माजी पंतप्रधान तसेच ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग हे वयाच्या ९२व्या वर्षी गुरुवारी रात्री कालवश झाले. त्यांच्या निधनामुळे देशाने एक अर्थऋषी गमावला आहे. मनमोहन सिंग यांच्यावर पूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जातील व सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा पाळला जाईल.प्रकृती बिघडल्यामुळे



त्यांना गुरुवारी रात्री दिल्लीतील एम्स रुग्णालयातील अतिदक्षता विभागात त्यांना दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान रात्री ९ वाजून ५१ मिनिटांनी त्यांचे निधन झाले. मनमोहन सिंग यांच्यामागे पत्नी गुरशरण कौर व तीन कन्या असा परिवार आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी दोनदा देशाचे पंतप्रधानपद भूषविले. गेल्या काही वर्षापासून ते प्रकृतीच्या तक्रारींमुळे त्रस्त होते. त्यांना याआधी काही वेळा प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात भरती करण्यात आले होते. त्यांचे निधन झाल्याचे वृत्त कळल्यानंतर काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी, सरचिटणीस व खासदार प्रियांका गांधी, भाजपचे अध्यक्ष व केंद्रीय मंत्री जगतप्रकाश नड्डा हे एम्समध्ये पोहोचले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनमोहनसिंग यांच्या कुटुंबीयांशी फोनवर संपर्क साधून त्यांचे सांत्वन केले.डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाच्या वृत्तानंतर कर्नाटक येथे बेळगाव येथे सुरु

डॉ. मनमोहनसिंग यांच्या निधनाने सारा देश शोकाकुल झाला आहे. कठीण परिस्थितीवर मात करून उच्चशिक्षण घेत ते विख्यात अर्थतज्ज्ञ बनले. त्यांच्या विचारांचा देशाच्या आर्थिक धोरणांवर अमीट ठसा उमटला. मनमोहनसिंग पंतप्रधान व मी गुजरातचा मुख्यमंत्री असताना आम्ही नेहमी एकमेकांशी संवाद साधत होतो. त्यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो – **नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

मनमोहन सिंग यांनी प्रचंड ज्ञान आणि सचोटीने भारताचे नेतृत्व केले. त्यांची नम्रता आणि अर्थशास्त्राची सखोल समज देशाला प्रेरणा देत होती. मी एक मार्गदर्शक गमावला आहे

– **राहुल गांधी,** लोकसभेतील विरोधी पक्षनेते

असलेली काँग्रेस कार्यकारिणीची बैठक रद्द करण्यात आली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे हे तातडीने बेळगावहून रवाना झाले व गुरुवारी मध्यरात्रीनंतर दिल्लीला पोहोचले.

# नविन वर्षात खगोलीय घटनांची रेलचेल

# चार ग्रहणे, ११ उल्कावर्षाव सुपरमूनची नवलाई

## खग्रास चंद्रग्रहण, शनि – युरेनस पृथ्वीजवळ येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती –** अंतराळात दररोज असंख्य घडामोडी घडतात. या प्रत्येक घडामोडीला खगोलशास्त्रात फार महत्व असते. २०२५ या वर्षात अनेक खगोलीय घटनांची रेलचेल आहे. २०२५ वर्षात दोन चंद्रग्रहणे, दोन सूर्यग्रहणे, ११ उल्कावर्षाव, सूपरमून, धूमकेतू, ग्रह– ताऱ्यांची युती–प्रतियुती, ग्रह दर्शन, त्यांचे उदयास्त, राशी भ्रमण अशा अनेक खगोलीय घटनांची मेजवानी आकाश निरीक्षणप्रेमींना मिळणार असल्याची माहिती मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रविण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर यांनी दिली आहे.३ जानेवारी रोजी पृथ्वी–सूर्य हे अंतर कमीत कमी राहील. या घटनेला खगोलशास्त्रात 'पेरेहेलिऑन' असे म्हणतात. ४ जानेवारी रोजी शनि ग्रह काही वेळासाठी चंद्रामागे झाकला जाईल. या घटनेला खगोलशास्त्रात 'पिधानयूती' असे म्हणतात. २० जानेवारीला शुक्राजवळ शनि दिसेल.

२ फेब्रुवारी रोजी शुक्र व चंद्राची यूती राहील. ८ फेब्रुवारी रोजी पहाटे 'नरतुरंग उल्का वर्षाव' पाहता येईल. ८ मार्च रोजी पश्चिम क्षितीजावर सायंकाळी बुध ग्रह दिसेल. १४ मार्च रोजी खंडग्रास चंद्रग्रहण आहे. हे भारतातून दिसणार नाही. २० मार्च रोजी दिवस व रात्र सारखी राहील.

६ एप्रिल रोजी चंद्राजवळमंगळदिसेल. २२ व २३ एप्रिल रोजी उल्का वर्षाव दिसेल. ४ मे रोजी मंगळव चंद्राची यूती राहील. २४ मे रोजी शनि ग्रह काही काळासाठी चंद्रामागे झाकला जाईल. २१ जूनचादिवस मोठा राहील, हादिवस १३ तास १३ मिनीटांचा राहील. रात्रलहान राहील. ४ जुलै रोजी पृथ्वी– सूर्य हे अंतर जास्तीत जास्त राहील. ४



ऑगस्ट रोजी जेष्ठ तारा व चंद्र यांची पिधानयूती राहील. १२ ऑगस्ट रोजी उल्का वर्षाव राहील. ७ सप्टेंबर रोजी खग्रास चंद्रग्रहण राहील. है भारतातून दिसेल. २१ सप्टेंबर रोजी शनि पृथ्वीच्या जवळ राहील. २२ सप्टेंबर रोजी दिवस वरात्र सारखी राहील.

८ ऑक्टोबर रोजी 'कालेय तारकासमूहातून' उल्का वर्षाव होईल. १७ व १८ नोव्हेंबर रोजी 'लिओनिड्स' उल्का वर्षा होईल. २१ नोव्हेंबर रोजी यूरेनस पृथ्वीच्या जवळराहील. १४ डिसेंबरप रोजी 'जेमेनिड्स' उल्का वर्षाव होईल. २१ डिसेंबर रोजी दिवस लहान राहील. १० तास ४७ मिनीटांचा राहील. वरील सर्व घटना या नैसर्गिक आहे. याचा राशीनुसार मानवी जीवनावर कोणताही परिणाम होणार नाही. त्यामूळे कर्मकांडाच्या मागे न लागता या विलोभनीय खगोलीय घटनांचे निरीक्षण करुन याचा आनंद घ्यावा असे आवाहन मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रविण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय म.गिरुळकर यांनी केले आहे. या घटनेविषयी अधिक माहिती पाहिजे असल्यास मो.नं. ९६३७३८४८१२ वर संपर्क साधावा.

# मंडळ अधिकाऱ्यावर ट्रॅक्टर नेण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ वरूड :** तालुक्यातील देऊतवाडा पवनी शिवारात अवैध गौण खनिज उत्खननप्रकरणी कारवाई करणाऱ्या मंडळ अधिकासह महसूल पथकावर ट्रॅक्टर नेण्याचा प्रयत्न करण्यात आला तसेच जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी वरुड तालुक्यातील एकाला अटक करण्यात आली.पोलीस सूत्रांनुसार, चेतन रामजी काटसर्पे (रा. पवनी संक्राजी), पिंटू ठाकरे (रा. चिंचरगव्हाण) आणि आणखी एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. २४ डिसेंबर रोजी रात्री ९ च्या सुमारास हाघटनाक्रम घडला. काटोल तालुक्यातील काटोल पंचवटी येथील मंडळ अधिकारी देवेंद्र गेडाम (५३) हे पथकासह गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीवर कारवाईकरिता गस्तीवर असताना, वरूड पोलिस ठाण्याच्या हद्दीत चेतन काटसर्पे हा विनाक्रमांकाच्या ट्रॅक्टरमध्ये अवैध रेती वाहतूक करताना आढळला. यावेळी त्याचा सहकारी पिंटू ठाकरे तेथे आला आणि रेतीचा ट्रॅक्टर पळविण्याचा प्रयत्न केला. याच वेळी शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी ही त्याने दिली. चेतन काटसर्पे याला २५ डिसेंबर रोजी रात्री अटक करण्यात आली.

# तळेगाव दशासर मध्ये १५ जानेवारी पासून शंकर पट

## यात्रा महोत्सवकृषक सुधार मंडळातर्फे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७धा. रेल्वे –** संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले आणि १५१ व्या वर्षात पदार्पण करणारे तालुक्यातील तळेगाव दशासर येथील शंकरपट व यात्रा महोत्सव १५ जानेवारी म्हणजेच मकर संक्रांतीच्या पर्वापासून सुरू होणार आहे.

कृषक सुधार मंडळ, तळेगांव दशासर यांच्या वतीने कै. नानासाहेब देशमुख यांनी १५१ वर्षापुर्वी सुरु केलेल्या व बापुसाहेब देशमुख यांनी चालविलेल्या व रावसाहेवजी देशमुख यांनी कायम सुरु ठेवलेल्या जंगी बैलजोडी स्पर्धा, कुस्ती स्पर्धा व तळेगांव दशासर यात्रा महोत्सवाला १५ जानेवारी पासून सुरुवात होणार आहे. या परंपरेतमहिला राखीव शंकर पटाने एक नवीन अध्याय जोडला गेला आहे. रावसाहेब उर्फ वसंतराव देशमुख यांनी सुरू केले. रावसाहेब देशमुखांसह शिवाजीराव देशमुख आणि कृषक सुधार मंडळातर्फे येत्या १५ जानेवारी पासून सुरू पट होणार आहेकार्यक्रमाची संपूर्ण तयारी करण्यात आली आहे. १५ जानेवारीपासून शंकरपटात दोन दाणी बैलजोडी स्पर्धेपासून सुरूवात होईल. १६ जानेवारी १७ रोजी एक दाणी बैलजोडी स्पर्धा होणार असून यामध्ये दोन गट अ आणि ड यांचा समावेशकरण्यात आला आहे. यासाठी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. एक दाणी बैलजोडी स्पर्धेतही गटात पुरस्कार ठेवण्यात आले आहे. तसेच इतर बक्षीस ठेवण्यात आले आहे. कृषक सुधार मंडळातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शंकरपट व यात्रा महोत्सवाची नियोजन सभा बुधवारी पार पडली. यात बैलजोडी स्पर्धेची रूपरेषा, आयोजन, नियोजन, कायदा व्यवस्था यावर चर्चा करण्यात आली. यावेळी प्रवीण घुईखेडकर, ठाणेदार रामेश्वर धोंडगे, आनंद देशमुख, विनोद रामेकर, नरेंद्र रामावत, रवि चुटे, पोमेश थोरात, डॉ. विनोद देशमुख, दिवाकर ठाकरे, अशोक गायकवाड, गजानन शेंद्रे, भोगे, फारूकभाई, भाऊराव इंगोले,मान्यवर उपस्थित होते.

# सुट्ट्यांची यादी जाहीर! १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतचे सर्व सण वाचा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती**




नवीन वर्षाचे कॅलेंडर आले की सगळ्यात पहिला आपण गणेशोत्सव, आपला वाढदिवस, त्याचबरोबर रविवारी कोणता सण आला नाही ना हे सगळ्यात पहिल्यांदा पाहून घेतो. तर यंदा २०२५ मध्ये प्रजासत्ताक दिन, गुढीपाडवा, रामनवमी, मोहरम यांसारखे सण रविवारी येणार आहेत.

महाराष्ट्र सरकारने ४ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे २०२५ या वर्षासाठी सार्वजनिक सुट्ट्या जाहीर केल्या आहेत. १८८१ च्या निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्टच्या कलम २५ द्वारे आधारित, राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना अधिकृतपणे वर्षभर विशिष्ट दिवशी सुट्ट्या देतात. महाराष्ट्रात फक्त बँकांना त्यांची वार्षिक खाती बंद करण्यासाठी मंगळवार, दिनांक १ एप्रिल २०२५ रोजी सुट्टी असेल. पण, सरकारी कार्यालयांना या सुट्टीतून सूट देण्यात आली आहे.

महाराष्ट्र सरकारने २४ सार्वजनिक सुट्ट्यांव्यतिरिक्त २३ ऑक्टोबर २०२५ (गुरुवार) रोजी भाऊबीज, ही पुढील संस्थांसाठी अतिरिक्त सुट्टी म्हणून घोषित केली आहे. त्यामध्ये

१. राज्यातील सरकारी कार्यालये

२. राज्यातील सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम

३. महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायत, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती आदींचा समावेश आहे.

जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतचे हिंदुंचे सर्व सण

भोगी, सोमवार १३/०१/२०२५

मकरसंक्रांत, मंगळवार १४/०१/२०२५

श्रीगणेश जयंती, शनिवार ०१/०२/२०२५

महाशिवरात्री, बुधबार २६/०२/२०२५

एकादशी, सोमवार १०/०३/२०२५

होळी, गुरुवार १३/०३/२०२५

धूलिवंदन, शुक्रवार १४/०३/२०२५

गुढीपाडवा, रविवार ३०/०३/२०२५

वटपौर्णिमा, मंगळवार १०/०६/२०२५

नागपंचमी, मंगळवार २९/०७/२०२५

नारळी पौर्णिमा, शुक्रवार ०८/०८/२०२५

रक्षाबंधन, शनिवार ०९/०८/२०२५

श्रीकृष्ण जन्माष्टमी, शुक्रवार १५/०८/२०२५

श्रीगणेश चतुर्थी, बुधवार २७/०८/२०२५

गौरी विसर्जन, मंगळवार ०२/०९/२०२५

अनंत चतुर्दशी, शनिवार ०६/०९/२०२५

महालयारंभ, सोमवार ०८/०९/२०२५

घटस्थापना, सोमवार २२/०९/२०२५

दसरा, गुरुवार ०२/१०/२०२५

धनत्रयोदशी, शनिवार १८/१०/२०२५

अभ्यंगस्नान, सोमवार २०/१०/२०२५

भाऊबीज, गुरुवार २३/१०/२०२५

तुलसी विवाहारंभ, रविवार ०२/११/२०२५

त्रिपुरारी पौर्णिमा, बुधवार ०५/११/२०२५

देव दीपावली, शुक्रवार २१/११/२०२५

श्रीदत्त जन्मोत्सव, गुरुवार ०४/१२/२०२५

### सरकारी कर्मचाऱ्यांची सुट्टयांची यादी

| क्रमांक सुट्टी | तारीख | दिवस |
|---|---|---|
| १.प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी २०२५ | रविवार |
| २.छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी २०२५ | गुरुवार |
| ३.महाशिवरात्री | २६ फेब्रुवारी २०२५ | बुधवार |
| ४.होळी (दुसरा दिवस) | १४ मार्च २०२५ | शुक्रवार |
| ५.गुढीपाडवा | ३० मार्च २०२५ | रविवार |
| ६.रमजान-ईद | ३१ मार्च २०२५ | सोमवार |
| ७.राम नवमी | ६ एप्रिल २०२५ | रविवार |
| ८.महावीर जन्मकल्याणक | १० एप्रिल २०२५ | गुरुवार |
| ९.डॉ. आंबेडकर जयंती | १४ एप्रिल २०२५ | सोमवार |
| १०गुड फ्रायडे | १८ एप्रिल २०२५ | शुक्रवार |
| ११.महाराष्ट्र दिन | १ मे २०२५ | गुरुवार |
| १२.बुद्ध पौर्णिमा | १२ मे २०२५ | सोमवार |
| १३.बकरी ईद | ७ जून २०२५ | शनिवार |
| १४.मोहरम | ६ जुलै २०२५ | रविवार |
| १५.स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट २०५ | शुक्रवार |
| १६.पारसी नववर्ष | १५ ऑगस्ट २०२५ | शुक्रवार |
| १७.गणेश चतुर्थी | २७ ऑगस्ट २०२५ | बुधवार |
| १८.ईद-ए-मिलाद | ५ सप्टेंबर २०२५ | शुक्रवार |
| १९.महात्मा गांधी जयंती | २ ऑक्टोबर २०२५ | गुरुवार |
| २०.दसरा | २ ऑक्टोबर २०२५ | गुरुवार |
| २१.लक्ष्मीपूजन ) | २१ ऑक्टोबर २०२५ | मंगळवार |
| २२.(बलिप्रतिपदा) | २२ ऑक्टोबर २०२५ | बुधवार |
| २३.गुरु नानक जयंती | ५ नोव्हेंबर २०२५ | बुधवार |
| २४.ख्रिसमस | २५ डिसेंबर २०२५ | बुधवार |

# करीना थापाला राष्ट्रपतींच्या हस्ते 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' प्रदान

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२७अमरावती, –** प्राण पणाला लावून कठोरा भागातील जय अंबा अपार्टमेंटच्या ७० कुटुंबांचे रक्षण करणाऱ्या करिना थापाला राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांच्या हस्ते आज राष्ट्रपती भवनात एका शानदार कार्यक्रमात प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने गौरविण्यात आले. वीर बाल दिनाच्या औचित्याने केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रपती भवनात आयोजित या कार्यक्रमास विभागाच्या मंत्री अन्नपूर्णा देवी, राज्यमंत्री सावित्री ठाकूर आणि सचिव अनिल मलिक उपस्थित होते. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते विविध श्रेणी मध्ये देशातील १७ बालकांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने गौरविण्यात आले.पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. समयसूचकता व धाडसाच्या जोरावर करिनाने सिलेंडरचा स्फोट होण्यापासून थांबवला व भीषण अपघातातून अपार्टमेंटचे रक्षण केले.शौर्य, क्रीडा, समाजसेवा, विज्ञान–तंत्रज्ञान, पर्यावरण, कला व संस्कृती आणि संशोधन क्षेत्रामध्ये कतृत्वाची छाप सोडणाऱ्या भारतातील मुला–मुलींची विविध निकषांच्या आधारे या पुरस्कारासाठी निवड केली जाते.

शिखांचे दहावे गुरू गुरु गोविंद सिंग यांचे पुत्र साहिबजादा जोरावरसिंह आणि साहिबजादा फतेहसिंह यांनी देशासाठी दिलेल्या प्राणांच्या आहुतीचे स्मरण म्हणून २६ डिसेंबर रोजी वीर बाल दिनाच्या औचित्याने केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाच्यावतीने हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

अपार्टमेंटमध्ये १५ मे २०२४ च्या सायंकाळी ६.०० वाजता ही दुर्घटना घडली. घरकाम करणाऱ्या करीना थापाने बंद असलेल्या



शेजारच्या फ्लॅटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. मात्र, आग आणि धुराचे लोट येत असतानाही पाण्याच्या बादल्यांचा सतत मारा करत तीने सिलेंडर शेजारील आग पूर्णपणे आटोक्यात आणत



सिलेंडर बाहेर काढले.अशात सिलेंडरचा स्फोट कधीही होऊ शकला असता. करीनाच्या समय सूचकतेमुळे मोठा अनर्थ टळला व अपार्टमेंटचे रक्षण झाले.

या सर्व घटनाक्रमात धाडस व समयसूचकतेचा परिचय देणाऱ्या करिनाच्या या अनन्यसाधारण कार्याची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाला पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला.सर्व निकषांती प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी तिची निवड झाली.

# ‘ग्लोबल ल्युमनी मीट २०२४’ चे थाटात उद्घाटन

## महाविद्यालयाच्या सर्वांगिण विकासासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे-बीएटीयुचे माजी कुलगुरू डॉ. अशोक घाटोळ

## माजी विद्यार्थ्यांकडून सव्वा कोटीच्या ‘स्पंदन ऑडीटोरियम’ची निर्मिती





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

ज्या महाविद्यालयातून अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊन आपण घडलो. त्या संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या सर्वांगिण विकासासाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेचे माजी कुलगुरु डॉ. अशोक घाटोळ यांनी आज येथे केले.

हिरक महोत्सवी वर्षानिमित्त येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरात माजी विद्यार्थ्यांचा जागतिक मेळाव्याचे (ग्लोबल ल्युमनी मीट २०२४) आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. महाविद्यालयाच्या १९६४ च्या पहिल्या बॅचचे माजी विद्यार्थी संशोधक प्रा. विजय इंगोले, माजी विद्यार्थी सज्जनसिंग चव्हाण (आयएएस), विकास सुरळकर (आयएएस), श्रीमती प्रेरणा देशभ्रतार (आयएएस), हेमंत कोठीकर (आयआरएस), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सहसंचालक प्रदीप घुले, आयआरबी मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजय देशमुख, जिओ-टीएम फोरमचे वरिष्ठ मुख्याधिकारी अनिकेत म्हाला, अस्पा बँड सन्सचे व्यवस्थापकीय संचालक रणजित बंड, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष किरण पातुरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य आशिष महल्ले, जीसीओई महाविद्यालयाच्या बोर्ड ऑफ गव्हर्नन्सचे सदस्य नेमराज देशमुख आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

संस्थेच्या १९९० च्या माजी विद्यार्थ्यांनी सव्वा कोटी रुपयांचे स्पंदन ऑडीटोरियम बांधून संस्थेच्या इन्फ्रास्ट्रक्चरल सुविधेत भर टाकून एक आदर्श स्थापित केला, याबद्दल उपस्थित सर्वांनी त्यांचे कौतूक केले.

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. घाटोळ म्हणाले की, संसाधनांची कमतरता असून सुध्दा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने आपली गुणवत्ता व दर्जा टिकून ठेवला आहे. त्यासाठी माझ्यासह, सन १९६४ पासून ते आजपर्यंतच्या प्राचार्यांनी विशेष प्रयत्न करुन परिश्रम घेतले आहे. त्यामुळेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयास शासनाची स्वायत्तता मिळाली आहे. महाविद्यालयाच्या गुणवान विद्यार्थ्यांमुळे तसेच नवीनतम उपक्रमांमुळे भविष्यात हे महाविद्यालय अभियांत्रिकी विद्यापीठ बनेल, असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला. या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनीही राज्य, देश व जागतिक पातळीवर महाविद्यालयाचे नाव रोषण केले आहे. त्याचीच प्रचिती म्हणून १९९० बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांसाठी सव्वा कोटी रुपयांचे सर्व सोयी-सुविधायुक्त स्पंदन ऑडीटोरियम तयार करुन दिले आहे. आज त्या ऑडीटोरियमचे उद्घाटन होत आहे, ही अतिशय गौरवाची बाब आहे. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचा प्रवास त्यांनी उलगडून सांगितला. महाविद्यालयातून उत्तीर्ण होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाला आपले काही देणे आहे, या भावनेतून संस्थेच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे आवाहन डॉ. घाटोळ यांनी केले.

जीसीओई संस्थेतून उत्तीर्ण होऊन गेलेले अनेक विद्यार्थी विविध कार्यक्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत आहे. काहीजण आयएएस, आयआरएस तसेच अभियांत्रिकी क्षेत्रातील नामांकीत कंपनीत वरिष्ठ पदावर कार्यरत आहे. माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याच्या आयोजनातून त्यांच्या यशस्वी वाटचालीबाबत विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन घ्यावे. माजी विद्यार्थ्यांनी सुध्दा आपल्या महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी डिजीटल ग्रंथालय, इमारत बांधकाम, अत्याधुनिक लॅब निर्मितीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन अन्य निमंत्रित मान्यवरांनी केले. यावेळी मान्यवरांनी महाविद्यालयातील जुन्या आठवणी व प्रसंगांना उजाळा देत अभियांत्रिकी अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण कसा केला यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मान्यवरांनी त्यांच्या यशस्वी जडणघडणीत महाविद्यालयाची महत्वपूर्ण भूमिकेसंदर्भात माहिती दिली. विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवेत येऊन देशसेवा करावी. तसेच आपल्या मातृसंस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी मदत करावी. महाविद्यालयात ’ ऑफ एक्सलन्स’ची निर्मिती होण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. प्राचार्य श्री. महल्ले यांनी माजी विद्यार्थ्यांकडून संस्थेला अपेक्षित असलेले सहकार्य व मदत याबाबत विस्तृत विवेचन केले.याप्रसंगी कार्यक्रमाला उपस्थित माजी प्राचार्य, माजी प्राध्यापक वर्ग, माजी विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती पुजन, आराधना व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. महाविद्यालयाच्या जडणघडण व यशस्वी वाटचाल यासंबंधी लघु चित्रफीत दाखविण्यात आली. तसेच महाविद्यालयाच्या विविध विद्याशाखा, यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा परिचय व उपक्रमाबाबत प्रा. नितीन पाठक यांनी प्रास्ताविकातून माहिती दिली.देश-विदेशातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, माजी प्राध्यापक वर्ग व माजी प्राचार्य आदी ग्लोबल ल्युमनी मीट २०२४ मध्ये सहभागी होते. आभार प्रदर्शन प्रा. माहेश्वरी यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अवघी दुमदुमली संतनगरी! विदर्भाच्या पंढरीत पाऊण लाख भाविकांची मंदियाळी

## ३१ ला समाधी मंदिर रात्रभर राहणार खुले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७शेगाव** - नाताळ निमित्त असलेल्या सुट्ट्यांमुळे सध्या राज्यातील पर्यटन केंद्रे, धार्मिक स्थळे पर्यटक आणि भाविकांनी गजबजली आहेत. याला विदर्भ पंढरी म्हणून विख्यात शेगाव नगरी देखील अपवाद नाही.

आज २६ डिसेंबर रोजी सकाळपासून दिवसभर संतनगरी शेगावमध्ये हेच दृश्य पाहवयास मिळाले. मार्गशिष् महिन्याचा चौथा गुरुवार आणि एकादशी असा दुग्ध शर्करा योग जुळून आला. यामुळे संतनगरीत कमीअधिक पाऊण लाख भाविकांची मांदियाळी जमल्याचे दिसून आले. यामुळे संत गजानन महाराज संस्थान मंदिर परिसर ते मंदिराकडे येणारे मार्ग आबालवृद्ध भाविकांनी नुसते फुलून गेल्याचे चित्र होते. विदर्भासह राज्यातील हजारो भाविक, बुधवारपासूनच शेगाव नगरीत डेरे दाखल झाले होते. तसेच नजीकच्या जिल्ह्यातील पायी दिंड्याचे देखील आगमन झाले. त्यांच्या निवासाची संस्थानमार्फत सुसज्ज व्यवस्था करण्यात आली.

### दर्शनासाठी तीन तास

‘श्रीं’ च्या समाधी स्थळी नतमस्तक होण्यासाठी भाविकांच्या आज गुरुवारी पहाटेपासूनच रांगा लागल्याचे दिसून आले. उत्तरोत्तर दर्शन बारीतील गर्दी वाढतच गेली. आज मध्यान्ही या गर्दीने कळस गाठला. प्रत्यक्ष दर्शनासाठी तीन तास लागत होते. मुख दर्शनासाठी वीस मिनिटे ते अर्धा तास लागत होते. दुसरीकडे संस्थानकडून मोफत वितरित करण्यात येणाऱ्या महाप्रसादासाठी भाविकांच्या दीर्घ रांगा लागल्या.

शेगाव येथे येणाऱ्या सर्व रेल्वेगाड्या एसटी बसेसमधून मोठ्या प्रमाणात भाविक बाहेर पडताना दिसत होते. यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले. श्री संस्थानकडून भाविकांसाठी आज पहाटे ४ वाजतापासून श्रींचे मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. भक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्यात येत आहे. भाविकांसाठी एकेरी मार्ग करण्यात आला असून मंदिरामध्ये सकाळी १० ते ५ पर्यंत महाप्रसाद, श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, श्रींची गादी तसेच औदुंबर दर्शनाची व्यवस्था केली आहे. तसेच भक्तांच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्त निवासाची नियमानुसार राहण्याची व्यवस्था नित्याप्रमाणे सुरू आहे. संपूर्ण मंदिर परिसरात स्वच्छता ही भक्तांना श्रींच्या प्रति आपली आस्था प्रसन्न मनाने एकरूप करणारी आहे. भक्तांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी श्रींचे सेवेकरी आपली सेवा देण्यास तत्पर असल्याचे दिसून आले.

### ३१ ला समाधी मदिर रात्रभर खुले

संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने नाताळ सुट्टी, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्ष स्वागतानिमित्त श्रींच्या दर्शनासाठी होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन समाधी मंदिर ३१ डिसेंबर २०२४ रोजी दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात येणार आहे. संस्थानच्या वतीने ही माहिती देण्यात आली आहे.

# सातेगावचे सरपंच अपात्र घोषित

## घरकुल क्रमवारीत डावलल्याचे प्रकरण अंगलट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ सतेगाव-** सातेगावच्या सरपंच छाया राजेंद्र वानखडे यांनी पदाचा दुरुपयोग तसेच कर्तव्यात कसुर, अनियमितता केल्याचा ठपका ठेवत त्यांना सरपंच तथा पदाकरिता अपात्र घोषित करण्यात आले आहे.

सातेगाव ग्रामपंचायत अंतर्गत पंतप्रधान आवास योजनेत लाभार्थ्यांना नियमबाह्य पध्दतीने घरकुल योजनेत क्रमवारीतून डावलणे, गुणक्रमे लाभार्थी वगळून निकटच्या लाभार्थास लाभ पोहचविणे ईत्यादी बाबत सातेगाव येथीलच गजानन शे. चव्हाण यांनी अपर आयुक्तालय अमरावती येथे तक्रार दाखल केली होती. दरम्यान लाभार्थीनी आपल्या न्याय मागणीकरिता पंचायत समितीयासंदर्भात सरपंच छाया राजेंद्र वानखडे यांच्याशी सपर्क साधला असता यामध्ये तत्कालीन सचिव आणि पंचायत समितीचा दोष असून या निकालाविरोधात आम्ही वरिष्ठ न्यायालयात दाद मागणार असल्याचे सांगितले.अंजनगाव सुर्जी तथा जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपोषणही केले होते. दरम्यान २०२३ ला दाखल प्रकरणाचा निकाल देण्यात असून आयुक्त कार्यालयाच्या आदेशान्वये सरपंच छाया राजेंद्र वानखडे यांना पदाचा दुरुपयोग तसेच कर्तव्यात कसुर, अनियमितता केल्याचा ठपका ठेऊन सरपंचपदाकरिता अपात्र घोषित करण्यात आले.

# वाढोणा येथील तलाठ्यावर रेती तस्करांचा हल्ला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ वडकी (यवतमाळ) :** रेती तस्करांनी तलाठ्याशी हुज्जत घालून जीवघेणा हल्ला करीत गंभीर जखमी केले. ही घटना राळेगाव तालुक्यातील वाढोणा बाजार येथे मंगळवारी (दि. १७) रात्री ११ वाजताच्या सुमारास घडली. तलाठ्यावर सध्या सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचार सुरू आहे.

मिलिंद नामदेव लोहत असे जखमी तलाठ्याचे, तर प्रतीक वाढोणकर व इतर दोन, अशी हल्लेखोरांची नावे आहेत. तलाठी वाढोणा बाजार येथे कार्यरत आहेत. हल्लेखोरांनी रेती तस्करीच्या वादातून तलाठ्यावर जीवघेणा हल्ला केला. प्रतीक वाढोणकर व अन्य दोघांनी संगनमत करून लोखंडी रॉडने बेदम मारहाण करून जखमी केले. त्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पळून गेले. जखमी अवस्थेतील तलाठ्याला स्थानिक नागरिकांनी राळेगाव येथील रुग्णालयामध्ये आणले. त्यानंतर सेवाग्राम येथे भरती केले. वाढोणा बाजार येथे प्रतीक वाढोणकर व त्याच्या सहकाऱ्यांचा रेतीचा व्यवसाय आहे. तलाठ्याने अवैध रेती उत्खननावर रोख लावण्याचे प्रयत्न केल्यामुळे तस्करांनी हल्ला केल्याची माहिती पुढे येत आहे. याप्रकरणी वडकी पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १३२, १२१(२), २९६, ३५१(२) ३(५) अन्वये गुन्हा नोंद करून शोध सुरू केला आहे.

तलाठी संघटनेच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे.

# भुयारी गटार योजनेवरून आजी-माजी आमदारांमध्ये जुंपली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती :-** गेल्या अडीच दशकांपासून रखडलेल्या भुयारी गटार योजनेसाठी सतराशे कोटी रुपयांचा कृती आराखडा प्रस्तावित करण्यात आल्याचा दावा आमदार सुलभा खोडके यांनी केला असतानाच माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी ही कारकुनी उपलब्धी असल्याची टीका केली आहे. दोन्ही नेत्यांमध्ये आता पत्रकयुद्ध सुरू झाले आहे.

डॉ. सुनील देशमुख यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात भुयारी गटार योजनेला गती मिळावी, यासाठी जनहित याचिका दाखल केली आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार सुलभा खोडके यांनी या योजनेसाठी अमृत योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात १७०० रुपयांचा कृती आराखडा प्रस्तावित करण्यात आल्याचा आणि ही योजना लवकरच पूर्णत्वास नेण्याचा दावा करताना डॉ. देशमुख यांनी त्यांच्या कार्यकाळात या योजनेसाठी काय केले, असा प्रतिप्रश्न केला होता.

डॉ. देशमुख यांनी सुलभा खोडके यांचा दावा म्हणजे ‘बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी’ असल्याची टीका केली आहे. गेल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात भुयारी गटार योजनेसाठी आपण अत्यंत निष्क्रिय राहिल्याबाबत स्वतःचा बचाव करण्याचा केवीलवाना प्रयत्न त्यांनी केलेला आहे. उलटपक्षी २०१८ मध्ये केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानअंतर्गत अमृत योजनेअंतर्गत ८७ कोटी रुपयांचे शेवटचे काम माझ्या प्रयत्नाने मंजूर झाले होते. त्यानंतर गेल्या सहा वर्षाच्या कालावधीमध्ये नवीन काम मंजूर करणे तर दूरच, हेच मंजूर केलेले कामसुद्धा यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात सुलभा खोडके या अपयशी ठरल्याचे डॉ. देशमुख यांनी म्हटले आहे.

या विषयावर जाहीर चर्चा करण्याची आपली तयारी आहे. किती निधी या योजनेसाठी आपण आणला आहे, याचीसुद्धा चर्चा करु या, असे आव्हान डॉ. देशमुख यांनी दिले आहे. खोडके यांनी गेल्या पाच वर्षात निधी किती आणला, याबाबत प्रसिद्धीपत्रकात साधे अवाक्षरही काढण्यात आलेले नाही. त्याचबरोबर मोठा गाजावाजा करून सिंभोरा ते अमरावती या मुख्य जलवाहिनीकरिता ८५० कोटी रुपये मंजूर करून आणल्याचे त्यापूर्वी त्यांनी जाहीर केले होते, त्याचे काय झाले, याचीही माहिती अमरावतीकर जनतेस दिल्यास बरे होईल, असे डॉ. देशमुख यांनी म्हटले आहे.

आपल्या प्रयत्नातून २५ हजार मालमत्तांची जोडणी शासनाच्या खर्चाने करण्यासाठी ५९.५६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. संपूर्ण देशामध्ये शासन खर्चाने मालमत्ताधारकांवर कोणताही बोजा पडू न देता मोफत जोडणी करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची ही एकमेव घटना आहे.

मात्र गेल्या पाच वर्षांत या मालमत्तांपैकी केवळ सात ते आठ हजार मालमत्तांची जोडणी प्रशासन करू शकले. परंतु गेल्या पाच वर्षात कोणतेही काम पूर्णत्वास गेले नाही, ही खरी शोकांतिका असल्याचे डॉ. देशमुख यांनी म्हटले आहे.

# रासायनिक खतांची किंमतवाढ कुणाच्या फायद्याची?

## शेतकऱ्यांचा प्रश्न : नवीन वर्षात १ जानेवारीपासून लागू होणार दरवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

एकीकडे वाढलेल्या उत्पादन खर्चाने शेतकरी त्रस्त आहेत. उत्पादनातून पीक लागवडीचा खर्चही निघेनासा झाला आहे. पिकांना मिळणारा हमीभाव जेमतेम आहे. खुल्या बाजारात शेतकऱ्यांची लूट होत आहे. सध्या बाजारात भाजीपाल्याचे दर कमालीने घसरले आहेत. यातून पीक लागवड व काढणीचा खर्चही निघेनासा झाला असता १ जानेवारीपासून खत उत्पादक कंपन्यांनी रासायनिक खतांसाठी नवी दरवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे ही दरवाढ कुणाच्या फायद्याची? राजकारणी मंडळींच्या की उद्योजकांच्या फायद्याची, असा प्रश्न शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे.

राज्यात रासायनिक खतांच्या किमती आधीच जास्त असतानासुद्धा आता खत उत्पादक कंपन्यांनी १ जानेवारी २०२५ पासून दरवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक भार सोसावा लागणार आहे.शासनाची ही कृती शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरणार आहे. धान, सोयाबीन, कापूस, तूर, हरभरा, गहू, जवस, पोपट या शेतमालाचे भाव खुल्या बाजारात शासनाच्या हमीभावापेक्षा खाली आहेत. वेळेतहमीभावाने माल खरेदी करण्याची व्यवस्था नाही. परिणामी, शेतकऱ्यांना खासगी व्यापाऱ्यांना माल विकावा लागत आहे. परंतु, खासगी व्यापारी शेतकऱ्यांना अक्षरशः लुटत आहेत. खत कंपन्यांनी खताची भाववाढ जाहीर केली आहे.

त्यानुसार डीएपी खत १३५० वरून १५९० रुपये, ट्रीपल सुपर फॉस्फेट १३०० वरून १३५० रुपये, १०-२६-२६ खत १४७० वरून १७२५ रुपये व १२- ३२-१६ खत १४७० वरून १७२५, २०-२०-०१३ खत १२०० वरून १३०० रुपये होणार आहे.रासायनिक खतांची दरवाढ शेतकऱ्यांवर अन्याय करणारी आहे. एकीकडे शेतमालाचे भाव कमी होत असताना खतांची भाववाढ करून सरकार शेतकऱ्यांचा रोष ओढवून घेत आहे. तर दुसरीकडे खत उत्पादक कंपन्यांना मालामाल करीत असल्याची नाराजी शेतकऱ्यांत व्यक्त होत आहे.



### शासनाची उद्योजकांना साथ, शेतकऱ्यांकडे पाठ

जिल्ह्यात यंदा दिवाळी संपून दीड महिना लोटल्यानंतर शासनाकडून धानासाठी शासकीय हमीभाव केंद्र सुरू करण्यात आले. त्यातच मिळणारा हमीभाव शेतमालाच्या खर्चावर आधारित नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना तोटाच सहन करावा लागतो. हमी खरेदी केंद्रावर ओलाव्याचे कारण समोर करून परत पाठविण्यात येते. तसेच ओलावा कपात केला जातो. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे सांगते. मात्र, रासायनिक खतांची दरवाढ करून शासनाने उद्योजकांनाच साथ दिल्याची खंत शेतकऱ्यांत आहे.

# सावधान; नायलॉन मांजा विकाल तर कोठडीत जाल

## संक्रांतीला पतंग उडविण्याची परंपरा : मांजा ठरतोय जीवघेणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

संक्रांतीच्या सणाला पतंग उडविण्याची सर्वत्र जुनी परंपरा आहे. मात्र या परंपरेला नायलॉनच्या मांजाने गालबोट लावले लावले आहे. या मांजामुळे अनेकांच्या जिवाला धोका निर्माण होतो. आता नायलॉन मांजा विकणार तो कोठडीत जाणार आहे. दरम्यान, नायलॉन मांजा विकत घेणेही टाळले पाहिजे.



मकर संक्रांतीच्या १० ते १५ दिवस अगोदरपासून पतंग उडविण्याचा आनंद अनेक जण घेतात. यामध्ये एकमेकजण पतंग कापण्याचाही आनंद लुटतात. पतंग कापण्यात काहीच गैर नाही, मात्र दुसऱ्याची पतंग कापण्यासाठी एखाद्याचा जीव घेऊ शकेल, असा चिनी बनावटीचा नायलॉन मांजा पतंगीचा दोर म्हणून वापरणे धोक्याचे आहे, मात्र दुसऱ्याचे नुकसान झाले तर आपले कायबिघडते, अशी प्रवृत्ती काही व्यक्तींची राहत असल्याने ते मांजाचा वापर करतात, मांजामुळे पक्षी व मानवाचा जीव धोक्यात येती. नायलॉन मांजा विक्रीवर प्रतिबंध असला तरी काही नागरिक व मुले प्रतिबंधित मांजा खरेदी करतात.

**नायलॉन मांज्यावर बंदी**

नायलॉन मांजा अतिशय धोकादायक आहे. पक्षी तसेच एखाद्या व्यक्तीची मानसुद्धा मोडू शकते. त्या अशा प्रकारच्या मांजाची निर्मिती, साठवणूक, वाहतूक व विक्रीवर शासनाने प्रतिबंध घातला असल्याने तो बाळगणे कायद्याने गुन्हा आहे.

# कपाशीवर लाल्या, तुरीवर धुंवारी तर हरभऱ्यावर मर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ कुऱ्हा**

यावर्षी खरीप हंगामातील कपाशी पिकावर लाल्या नावाच्या रोगाने कपाशी पिक कपाशी पिकाच नापिकी दूरीचे पिक इतके चांगले होते की गेल्या पंधरा दिवसा आधी फार मोठी धुवारी पडल्यामुळे उभ्या तूरीचे झाडे सोकू लागले तूरी नापिकी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नापिकीचे सावट दिसून येत आहे.

तसेच सध्या सुरू असलेली रब्बी हंगामातील पीक परिस्थिती म्हणजेहरबरा (चना) तिवसा तालुक्यातीलकु- हावव-हा, मारडा, अंजनवती, भिवापूर, बोर्डा, हसनापूर, दुर्गवाडा, धारवाडा, कौंडण्यपूर, जहांगिरपूर, वंडली, छिंदवाडी या परिसरात भरपूर हरबऱ्याचा पेरा असून त्याही पिकावर मर नावाचा रोग आल्याचे दिसून येते आहे. तर गहू पिकावर तांबेरा नावाचा रोग आल्याचे वाट आहे. कारण सतत ढगाळ वातावरणामुळे यावर्षी पिकांची परिस्थिती फारच वाईट अवस्था शेतकऱ्यांवर येत आहे. कारण शेतकऱ्यांना महागाईचे बी बियाणे खते कीडनाशके तसेच मंजुरीइतरही खर्च करून सुद्धा पिकमात्र खर्च काढून त्यांना शेती करणे इतकी अवघड झाले की त्या शेतकऱ्यांनाच माहिती आहे. तेव्हा शासनाने शेतकऱ्यांच्या सर्व पिकांची पाहणी करून त्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी या परिसरातील सर्व शेतकऱ्यांची आहे.

# आवक वाढली, डाळ आवाक्यात जेवणावळीत आता घट्ट वरण

## काही डाळींचे भाव स्थिर : येत्या काही दिवसांत दरात घसरणीची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**



गत दोन महिन्यांच्या तुलनेत किरकोळ बाजारात काही डाळींच्या दरात वाढ झालेली असून, काही डाळींचे भाव कमी झाले आहेत. त्यामुळे सद्यःस्थितीला डाळींचे भाव स्थिर असल्याने आहेत. सध्या बाजारात नवीन तूरडाळ आली नसतानाही दर काहीसे घसरले आहेत; परंतु आणखी काही दिवसांनंतर नवीन डाळ बाजारात आल्यानंतर भाव घसरतील, अशी शक्यता व्यापारीवर्गाकडून व्यक्त केली जात आहे.अनेकदा भाजीपाल्यांचे भाव वाढल्याने सर्वसामान्य गोरगरिबांना डाळींचा आधार घ्यावा लागतो; परंतु मागील काही वर्षांमध्ये तूरडाळ, हरभरा डाळ, मूगडाळ, उडीद डाळ या सर्वांचेच भाव वाढतीवर असल्याने सर्वसामान्यांना आता डाळी खाणेही आर्थिक दृष्ट्या परवडण्यासारखे नाही. त्यामुळे अनेकजण भाजीपाला खाण्याला प्राधान्य देत आहे. सध्या बाजारात तूरडाळीचे भाव १६० रुपये किलोवर आहेत. तर उडीद आणि मूगडाळ १२८ व १२४ रुपयांवर आहे. असे आहेत डाळींचे दर तूर डाळ १६०, चना डाळ ९८, उडीद डाळ १२८, मूग डाळ १२४, मसूर डाळ १०८.

**तूरडाळ आणखी स्वस्त होणार**

सध्या अनेक भागांत तुरीच्या शेंगा चांगल्या लगडल्या असून काही दिवसांनंतर तूर कापणीला येणार आहे. दूर कापणी केल्यानंतर नवीन तूरडाळ बाजारात येईल. त्यानंतर तूरडाळीचे भाव सर्वच ठोक व किरकोळ बाजारात कमी होतील.

# काजू १२०० तर बदाम ८०० रुपये किलो; राज्यात थंडीचा कडाका अन् सुकामेव्याच्या दरांचा तडाखा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**



राज्यभरात थंडीचा कडाका वाढला आहे. यामुळे आरोग्याच्या दृष्टीने शरीरात उष्णता निर्माण होण्यासाठी आणि आरोग्यासाठी फायदेशीर असणाऱ्या सुकामेव्याला मागणी वाढली आहे. यंदा जगभरात बहुतांशी सुकामेव्याच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे विविध प्रकारच्या सुकामेव्याच्या दरात वाढ १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे सध्या सुकामेव्याचा बाजार तेजीत आहे.

मागील दोन वर्षे सातत्याने सुकामाव्याचे दर कमी होते; परंतु यंदा ग्राहकांना काही प्रमाणात सुकामेवा महाग खरेदी करावा लागत आहे. सुकामेव्याच्या दरात वाढ झाल्याने सर्वसामान्यांना याची झळ बसत आहे; परंतु यंदा थंडी जास्त असल्याने नागरिक सुकामेवा खरेदीवर भर देत आहेत.

बाजारात बदाम, खोबरे, जर्दाळू, अक्रोड, मनुका, पिस्ता, काजू, डिंक, खोबरे, जर्दाळूच्या मागणीत वाढ झाली आहे. हिवाळ्यात सुकामेवा खाल्ल्याने शरीराला आवश्यक सर्व घटक मिळतात. यामुळे शरीराची कॅलरीची गरज पूर्ण होते. यातून मिळणारे पोषक तत्त्व शरीराला उपयोगी पडतात. त्यामुळे थंडीच्या काळात सुकामेव्याला मागणी वाढते, असे मार्केटयार्डातील ड्रायफुट्स व्यापारी नवीन गोयल यांनी सांगितले.

**थंडीत सुकामेव्याला मागणी**

दिवाळीत थंडीची चाहूल लागताच सुकामेव्याला मोठ्या प्रमाणावर मागणी वाढते. हिवाळ्यात सुकामेवा खाल्ल्याने शरीराला आवश्यक सर्व घटक मिळतात. यामुळे शरीराची कॅलरीची गरज पूर्ण होते. यातून मिळणारे पोषक तत्त्व शरीराला उपयोगी पडतात.

**या देशांतून आयात**

खारा पिस्ता - इराण, अमेरिका, कॅलिफोर्निया
बदाम - कॅलिफोर्निया, ऑस्ट्रेलिया
पिस्ता - इराण, इराक
मॅमेरोन बदाम - इराण
अक्रोड - अमेरिका, चिली, भारताच्या काही भागांतून
अंजीर - इराण, अफगाणिस्तान
बेदाणा - अफगाणिस्तान, भारत

**देशांतर्गत आवक**

खोबरे : तमिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, कर्नाटक
काजू : गोवा, कर्नाटक, कोकण, केरळ
मनुके : सांगली, विजापूर, नाशिक, पंढरपूर

**महाग होण्याची कारणे**

वातावरणाच्या परिणामामुळे उत्पादनात घट

आयात होत असलेला सुकामेवा महागच येत आहे.

**भारतात सुकामेव्याची वाढती मागणी**

अतिउष्णता आणि अनियमित पर्जन्यमानामुळे काजूचे जागतिक उत्पादन घटले

झाडांवरून माल कमी निघाल्याने कच्चा काजूचा तुटवडा

### सुकामेव्याचे प्रतिकिलोचे भाव

| वस्तूचे नाव | नोव्हेंबर २०२४ | डिसेंबर २०२४ |
|---|---|---|
| काजू | ५५० ते ८५० | ८०० ते १२०० |
| अक्रोड बी | ८०० ते १२०० | १००० ते १५०० |
| अक्रोड (अखखा) | ४५० ते ६०० | ६०० ते ८०० |
| बदाम | ५०० ते ८०० | ५०० ते ८०० |
| अंजीर | ७०० ते १००० | १००० ते १५०० |
| काळे मनुके | ३०० ते ४०० | ५०० ते ६०० |
| बेदाणा (भारतीय) | २०० ते ३०० | २०० ते ३०० |
| खारा पिस्ता | ७०० ते १००० | १००० ते १५०० |
| जर्दाळू | २०० ते ४०० | ३०० ते ५०० |



# सांगलीतील मॉडेल स्कूल पॅटर्न राज्यभर राबविणार, शिक्षणमंत्र्यांचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७सांगली**

सांगली जिल्ह्यातील मॉडेल स्कूलचा उपक्रम राज्यभर राबविण्याचा निर्णय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी घेतला आहे. या संदर्भात त्यांनी सांगलीचे प्राथमिक शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड यांच्याकडून माहिती घेतली.

सांगलीच्या या पॅटर्नची राज्यभर चर्चा होत असल्याने मंत्री भुसे यांनीही शिक्षण खात्याचा कार्यभार स्वीकारताच हा निर्णय घेतला. गायकवाड यांनी मॉडेलचे सादरीकरण त्यांच्यापुढे केले. भुसे यांनी शिक्षण खात्याची जबाबदारी स्वीकारताच मालेगाव तालुक्यातील अनेक शाळांना भेटी दिल्या. विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती यांच्याशी संवाद साधला. शाळांची व शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याची गरज लक्षात घेऊन सांगली पॅटर्नची निवड मार्गदर्शक स्वरूपात केली.

सांगलीत तत्कालीन पालकमंत्री जयंत पाटील यांनी मॉडेल स्कूल मोहीम सुरू केली. जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र डुडी यांच्यामार्फत जिल्हाभरात राबविली. सध्या जिल्ह्यातील सर्वच प्राथमिक शाळांचा कायापालट झाला आहे. भौतिक सुविधांसोबतच शैक्षणिक दर्जाही उंचावला आहे. या कामी लोकांचाही सहभाग घेतला आहे. डुडी सध्या साताऱ्यात जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. मंत्री भुसे यांनी त्यांच्याकडूनही या उपक्रमाची माहिती घेतली. त्यानंतर गायकवाड यांना या उपक्रमाच्या सादरीकरणासाठी पाचारण केले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या सूचनेनुसार गायकवाड यांनी भुसे यांना या अभियानाची संपूर्ण माहिती दिली. राज्यभरात यापूर्वी शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी राबविलेल्या प्रयोगांची माहिती घेऊन गुणवत्तेचा पथदर्शक नवीन पॅटर्न तयार करणार असल्याचे भुसे म्हणाले. शिक्षण क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण करू असेही त्यांनी सांगितले.

# मनमोहन सिंग यांच्या निधनावर अण्णा हजारे यांनी व्यक्त केला शोक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २७ नवी दिल्ली**

मनमोहन सिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या कार्यकाळात त्यांच्या सरकारवर मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी २०११ साली मनमोहन सिंग सरकारविरोधात भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून मोठं आंदोलन छेडलं होतं. दिल्लीच्या आझाद मैदान व रामलीला मैदानावर अण्णा हजारे व त्यांच्या हजारो कार्यकर्त्यांनी आंदोलनात सहभाग घेतला होता. डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर आज अण्णा हजारेंनी त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना २०११ च्या आंदोलनाचाही उल्लेख केला.

अण्णा हजारेंनी मनमोहन सिंग यांच्याबाबत भावना व्यक्त करताना त्यांच्य कार्यकर्तृत्वाबाबत गौरवोद्गार काढले. प्रत्येकजण या जगात येत असतो, जात असतो. कोण आलं, कोण गेलं हे फारसं कुणाला कळत नाही. पण काही लोक असे असतात, जे आपल्या आठवणी कायम मागे ठेवून जातात. समाजात काहीतरी करून जातात. आपला ठसा उमटवून जातात. मनमोहन सिग यांच्या नेहमी देशाबाबत विचार करायचे. त्यामुळेच या देशाची अर्थव्यवस्था बदलली, त्यात मनमोहन सिंग यांचं फार मोठं योगदान आहे, असं अण्णा हजारे म्हणाले.

# जिल्हा सुशासन निर्देशांकात अमरावती जिल्ह्याचा चौथा क्रमांक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,**

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेला जिल्हा सुशासन निर्देशांक २०२४ मध्ये महाराष्ट्रातील एकूण ३६ जिल्ह्यापैकी अमरावती जिल्ह्याचा चौथा क्रमांक लागलेला आहे. सन २०२३ मध्ये अमरावती जिल्ह्याचा सुशासन निर्देशांकाचे गुणानुक्रमांक १५ असा होता. त्या अनुषंगाने निर्देशांकाच्या वाढीबाबत जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी सर्व विभागांशी सांगड घालून क्षेत्रनिहाय बैठका घेण्यात आल्या. त्याचे नियोजन करुन त्या अनुषंगाने उपाययोजना करण्यात आल्या.

महाराष्ट्र शासनाचा जिल्हा सुशासन निर्देशांक (डिजीजीआय) हा केंद्र शासनाचे सुशासन निर्देशांक (जीजीआय) च्या धर्तीवर विकसित करण्यात आलेला आहे. या निर्देशांकामध्ये जिल्ह्यातील प्रशासकीय, कृषी, आर्थिक, सामाजिक, आरोग्य, पर्यावरण, विधी व न्याय व इतर आवश्यक निकषांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या निर्देशांकामध्ये जिल्ह्यातील सुशासनाचे स्थितीचे मुल्यांकन करुन तुलनात्मक चित्र उपलब्ध करुन देणारे सर्व समावेशक व अंमलबजावणी करणे योग्य असे साधन आहे. या अंतर्गत कृषी आणि संलग्न क्षेत्र यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत गुणानुक्रमांक १५ वरुन थेट प्रथम क्रमांकावर तसेच नागरिक केंद्रित प्रशासन या क्षेत्रात गुणानुक्रमांक २० वरुन ५ व्या क्रमांकावर झेप घेण्यात आली तसेच सामाजिक विकास या क्षेत्रात गुणानुक्रमांक दुसरा गाठण्यात आला. सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि उपयुक्तता, पर्यावरण, वाणिज्य आणि उद्योग तसेच मनुष्यबळ विकास इत्यादी क्षेत्रांतील कामगिरीमध्ये जिल्ह्याची सुधारणा झालेली आहे. यासाठी प्रशासनातील विभागांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच मागे राहिलेल्या क्षेत्रांमध्ये सुधारणा करणेबाबत संबंधितांना जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी सूचना दिल्या.

# राम कृष्ण हरी! ३१ मार्च २०२५पर्यंत विठ्ठल-रखुमाई ऑनलाइन पूजा बुकिंग फुल्ल; भाविकांचा प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ पंढरपूर**

पंढरपूरचा विठुराया हे अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत. आषाढी आणि कार्तिकी एकादशीला पंढरपूर वारी करत लाखो वारकरी विठ्ठलाचे दर्शन घेतात. तर वर्षभर विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची रीघ लागलेलीच असते. यातच विठुरायाची पूजा करण्याचाही अनेकांचा मानस असतो. यासाठी मंदिर प्रशासनाने ऑनलाइन पद्धतीने पूजा बुकिंग करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली होती. याला भाविकांनी प्रचंड प्रतिसाद दिला असून, पहिल्याच दिवशी तीन महिन्यांच्या पूजेसाठी बुकिंग





फुल्ल झाल्याची माहिती देण्यात आली आहे.

भाविकांना घरबसल्या विठ्ठल रुक्मिणीच्या विविध पूजा बुकिंग करता याव्यात, यासाठी मंदिर समितीने २६ डिसेंबर २०२४ रोजी ऑनलाइन बुकिंगला सुरुवात केली. ०१ जानेवारी २०२५ ते ३१ मार्च २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी हे बुकिंग होते. पहिल्याच दिवशी देवाच्या सर्व नित्य पूजा बुक झाल्याने आता भाविकांना नित्य पूजेच्या बुकिंगसाठी पुढच्या तीन महिन्याची वाट पाहावी लागणार आहे. विठ्ठलाला रोज सकाळी होणारी महापूजा अर्थात नित्य पूजेचे आकर्षण जगभरातील भाविकांना असते.

**नित्य पूजेतून ५५ लाख रुपयांचे उत्पन्न**

या नित्य पूजेत देवाला दही दुधाचे स्नानापासून पोशाखापर्यंत सर्व उपचार केले जातात. या महापूजेच्या बुकिंगसाठी ऑनलाइन नोंदणीला सुरुवात झाली. विठुरायाच्या नित्य पूजेसाठी २५ हजार तर रुक्मिणी मातेच्या नित्य पूजेसाठी ११ हजार एवढे शुल्क ठरविण्यात आले. बुकिंग सुरू होताच भाविकांनी पहिल्या दिवशी तीन महिन्याच्या सर्व पूजा बुक केल्याने मंदिराला नुसत्या नित्य पूजेतून ५५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. पाद्यपूजा, तुळशी पूजा यासाठीही मोठ्या संख्येने बुकिंग झाले. अजूनही पाद्यपूजा व तुळशी पूजेच्या काही बुकिंग शिल्लक असून भाविकांना याचे घर बसल्या बुकिंग करता येणार आहे, असे म्हटले जात आहे.

दरम्यान, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचे काम सुरू असून या अंतर्गत संत नामदेव पायरीवरील पितळी दरवाजा चांदीचा बनविण्याचा ठराव मंदिर समितीच्या बैठकीमध्ये करण्यात आला होता. मागील आठ दिवसापासून सदर काम सुरू आहे. यामुळे येथून भाविकांना प्रवेश बंद ठेवण्यात आला आहे. येत्या आठ दिवसात सदर काम पूर्ण झाल्यानंतर मंदिराच्या प्रवेशद्वाराला मोठी झळाळी मिळणार आहे.


# संभाजीनगर राज्यात पहिलेच शहर

## नायलॉन मांजा विकणाऱ्यांवर 'संक्रांत' थेट हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा होणार दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७संभाजीनगर**

आता मांजा विकाल तर तुमच्यावर हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल होणार आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये मांजा विक्रीला बंदी घालण्यात आली असून, आजतागायत मांज्यामुळे अनेक जण जखमी झाले आहेत. तसेच काहींचा मृत्यूही झाला होता. त्यामुळे हा कठोर निर्णय घेण्यात आला आहे. मांजा विक्रेता असो किंवा खरेदी करणारा व्यक्ती, आदेशाचे उल्लंघन केल्यास त्यांच्याविरूद्ध कठोर पाऊलं उचलली जाणार असल्याचा निर्णय घेण्यात आलाय.

छत्रपती संभाजीनगर शहरात नायलॉन मांजा विकला तर हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल होईल. असा थेट इशारा पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिलाय. या निर्णयामुळे नायलॉन मांजाबाबत कलम ११० नुसार म्हणजेच सदोष मनुषयवधाच्या गुन्हांतर्गत कडक कारवाई केले जाईल. मांजा बाबात कडक कारवाई



छत्रपती संभाजीनगर शहरात महिनाभरात मांजामुळे १५ जण जखमी झाले आहेत. तसेच अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. यासह पक्षांना देखील याचा नाहक त्रास झालाय. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी ही कडक मोहीम हाती घेतलीय. शहरातील दुकानांमध्ये जर नायलॉन मांजा कुणी विकत असेल तर, त्यांच्यावर थेट कारवाई केली जाईल. आणि जर अल्पवयीन मुलं नायलॉन मांजा वापरताना दिसले तर, त्यांच्या पालकांवरही गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा देण्यात आलाय. त्यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगरासह नाशिकमध्ये देखील नायलॉन मांज्यावर बंदी घालण्यात आली होती. मात्र तरीही शहरात छुप्या पद्धतीनं मांजा विक्री केली जात होती. नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. उंचाळे पोलिसांनी ग्राहक पाठवून मांजा विक्रेता आणि त्याच्या साथीदारास ताब्यात घेत २ लाख रूपयांचे २१० नायलॉन मांजा जप्त केले आहे. तर दोघांवर संक्रांतीपर्यंत तडीपारीची कारवाई पोलिसांकडून करण्यात येणार आहे.

# बहिरम यात्रेनिमित्त वाहतूक मार्गात बदल;उल्लंघन करणाऱ्या विरूध्द होणार कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

बहिरम यात्रेनिमित्त शनिवार, रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशी यात्रेकरूंची गैरसोय व अपघात टाळण्यासाठी दि. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ सी वरील वाहतुक परतवाडा ते बैतुल व बैतुल ते परतवाडा रस्त्याने येणारे-जाणारे जडवाहनांसाठी शनिवार, रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशी खरपी ते कारंजा बहिरम गावादरम्यान प्रवेश निषेध करून त्याऐवजी खरपी गावारून कजरगाव-सर्फापूर-कारंजा बहिरम व कारंजा बहिरम वरून सर्फापुर-करजगाव-खरपी या पर्यायी मार्गाने वाहतुक वळविण्यात आली आहे.

सदर अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या विरूध्द मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी कळविले आहे.

# विदर्भातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करणारे डॉ. मनमोहन सिंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर**

१ जुलै २००६ रोजी नागपूरमध्ये तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी विदर्भात येऊन नागपूरमध्ये विदर्भातील सर्वाधिक दुष्काळग्रस्त , शेतकरी आतम्हत्याग्रस्त अशा सहा जिल्ह्यांसाठी शेतकऱ्यांना त्यांच्या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी ३७५० कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. त्यात ७१२ कोटी रुपयांचे



थकीत कर्जावरील व्याज माफी आणि ३-५ वर्षांसाठी १,३०० कोटी रुपयांचे कृषी कर्ज एक वर्षाच्या स्थगितीसह पुनर्निर्धारित करण्यासह अनेक उपाययोजनांचा समावेश होता. ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणाच्या समस्येकडे लक्ष देण्यासाठी एक तज्ज्ञ गटाची स्थापनाही त्यांनी केली.

२००४-०५ काळात विदर्भात शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न ऐरणीवर आला होता. शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव न मिळणे आणि शेतीसाठी घ्यावे लागणारे कर्ज यामुळे विदर्भातील शेतकरी अडचणीत सापडला होता. त्यातूनच आत्महत्यांचे प्रमाण अधिक वाढले होते. विशेषत: विदर्भातील यवतमाळ, वर्धा, अमरावती, वाशीम, अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण अधिक होते. त्यामुळे राज्यातील काँग्रेस आघाडी सरकार तसेच केंद्रातीलही काँग्रेसच्या नेतृत्वातील सरकारवर उपाययोजना करण्यासाठी दबाव वाढत चालला होता. त्याची दखल घेत तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी ३० जून व १ जलै २००६ असे दोन दिवस विदर्भाचा दौरा करून शेतकऱ्यांशी संवाद साधला होता. तत्कालीन कृषी मंत्री शरद पवारही त्यांच्या समवेत होते. यवतमाळ, वर्धा आणि अमरावती जिल्ह्यातील काही गावांना त्यांनी भेटी देऊन शेतकऱ्यांच्या दैनावस्थेची पाहणी केली होती. व १ जुलैला नागपूर येथे एतिहासिक ३,७५० कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आकडा१६०० वर गेला होता. सहा बाधित जिल्ह्यातील क्षेत्रांसाठी २००६-०७ साठी १,२७५ कोटी रुपयांच्या अतिरिक्त कृषी कर्जाची घोषणाही त्यांनी केली होती. त्यासाठी नाबार्डकडून विशेष पथके नियुक्त करण्यात आली होती. फक्त शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन डॉ. मनमोहन सिंग थांबले नाही तर त्यांनी सहा जिल्ह्यांतील मोठे, मध्यम आणि लघु पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्राकडून २,१७७ कोटी देण्याचीही घोषणा केली. तीन वर्षांत ही रक्कम देण्यात आली होती.

# १५ वर्षापर्यंत मुलांना मोबाईल बंदी; दाऊदी बोहरा समाजाचा क्रांतिकारी निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ पुणे**

सध्या मोठ्या प्रमाणावर लहान मुलं ही मोबाईलचा वापर करताना आपल्याला पाहायला मिळतात. जेवण करताना मोबाईल, घरी असताना मोबाईल, तसंच झोपताना देखील मोबाईलचा वापर होतो. मोबाईल स्क्रीनचा वापर अधिक होत असल्यानं लहान मुलांवर याचा मोठा परिणाम होत आहे. हीच बाब लक्षात घेत दाऊदी बोहरा समाजानं मोठा निर्णय घेतला आहे. या समाजानं १५ वर्षापर्यंत मुलांना मोबाईल वापरण्यास बंदी घातली आहे. या निर्णयाचं समजाकडून स्वागत करण्यात येत असून हा क्रांतिकारक निर्णय असल्याचं बोललं जातय.



जगातील प्रत्येक छोट्या मोठ्या देशात शहरात दाऊदी बोहरा समाज हा आपल्याला पाहायला मिळतो. या समाजाची ओळख म्हणजे या समाजाचे लोक व्यवसाय करतात. अतिशय जागृत आणि एकमेकांना मदत करणारा, अशी या समाजाची ओळख आहे. या समाजाचे धर्मगुरू सय्यदना यांनी मुंबई येथे झालेल्या व्याख्यानात समाजातील लहान मुलांना मोबाईल बंदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

याबाबत दाऊदी बोहरा समाजाचे सामाजिक कार्यकर्ते युसुफ डांबरवाले म्हणाले, सध्या लहान मुलांमध्ये मोबाईल स्क्रीन बाबतचा जो प्रॉब्लेम आहे तो फक्त आमच्या समजापुरता मर्यादित नाही. आजकाल प्रत्येकाच्या घरात ही समस्या निर्माण झाली आहे. लहान मुलं सध्या मोठ्या प्रमाणावर मोबाईलचा वापर करत असतात. मुलं रडली किंवा जेवत नसली की त्यांना पालकही मोबाईल देतात. हीच बाब लक्षात घेत धर्मगुरू सय्यदना यांनी प्रवचनात १५ वर्षापर्यंत मुलांना मोबाईल वापरण्यावर बंदी आणण्याचा निर्णय घेतला आहे. आता या निर्णयाचं आम्ही सर्वजण पालन करत आहोत. तसंच ठिकठिकाणी जाऊन मुलांमध्ये मोबाईल न वापरण्याबाबत जनजागृती करत आहोत.

यावेळी याच समाजाचे मुर्तुझा मॅनेजर म्हणाले, जेव्हा आमच्या सय्यदना यांनी हा निर्णय घेतला तेव्हापासूनच आम्ही याची अंमलबजावणी ही सुरू केली आहे. आमच्यात धर्मगुरू सय्यदना जे काही निर्णय घेतील तो सर्वांना मान्य असतो. आता त्यांचा हा निर्णय लहान मुले देखील मान्य करत आहेत. गेल्या तीन ते चार दिवसांपासून माझी मुलं मोबाईल वापरत नाहीत. हा क्रांतिकारी निर्णय असून मी तर सर्वांना आवाहन करेन की, याची अंमलबजावणी सर्वांनी करावी.

# कोणाच्याही नादी लाग, पण या रगेलच्या नादी लागू नको

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २७ मुंबई**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून आता महायुतीतील नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस यांनी राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांवर आरोप केल्यानंतर आता राष्ट्रवादीकडून प्रवक्ते व आमदार अमोल मिटकरी यांनी धस यांच्यावर गंभीर आरोप केले. संजय राऊत व सुरेश धस यांनी यात उपमुख्यमंत्री अजितदादाना टार्गेट करने सुरू केले आहे. या हत्याकांडातील आरोपी फासावर गेले पाहिजेत, ही धनंजय मुंडे साहेबांची सुरुवातपासून भूमिका असताना या प्रकरणात धनंजय मुंडे यांचं राजकारण संपवण्याची सुपारी घेतल्याच्या भूमिकेत धस आले आहेत, असा हल्लाबोल मिटकरी यांनी केला होता. मिटकरी यांच्या या आरोपाला आमदार धस यांनी आपल्या खास शैलीत उत्तर दिलं आहे.

# भाऊसाहेबांचे विचार व कार्य युवा पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी डिजिटायझेशन व्हावे : कुलगुरू




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २७ अमरावती**

शिक्षणमहर्षि डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था स्थापन करुन शिक्षणाची सोय बहुजनांना उपलब्ध करुन दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे बहुजन विद्यार्थी शिक्षण घेवू शकलेत आणि घेत आहेत. त्यामुळे ज्ञानी समाज निर्माण करण्यामध्ये त्यांचे फार मोठे योगदान राहिले आहे. भारताचे प्रथम कृषीमंत्री म्हणून कृषीक्षेत्राच्या विकासाकरीता त्यांनी फार मोठे कार्य केले असून समाजाच्या व देशाच्या विकासासाठी त्यांचे विचार व कार्य मोलाचे आहेत. आजच्या युवा पिढीपर्यंत भाऊसाहेबांचे विचार व कार्य पोहचले पाहिजे, म्हणून विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्राच्या माध्यमातून डिजिटायझेशनचे कार्य हाती घेणार असून समाजमाध्यमांच्या माध्यमातून युवा पिढीपर्यंत विशेषत: विद्यार्थ्यांपर्यंत त्यांचे विचार व कार्य नक्कीच पोहचतील. भाऊसाहेबांच्या विचार व कार्यापासून प्रेरणा घेवून आपले विद्यार्थी तयार होतील आणि देशाच्या विकासामध्ये त्यांचा हातभार लागेल, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा जयंती कार्यक्रम डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र इमारतीमध्ये आयोजित करण्यात आला होता, त्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे आदी उपस्थित होते. जयंतीप्रसंगी डॉ. पंजाबराव देशमुख व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. संचालन समन्वयक डॉ. महेंद्र मेटे यांनी केले. जयंती कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठए संख्येने उपस्थित होते.

# सुसंस्कार शिबिर काळाची गरज - ग्रामगिताचार्य रायजीप्रभू शेलोटकर

## दापोरी येथील शकडो विद्यार्थ्यांचा संस्कार शिबिरात सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील ग्राम दापोरी येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५६ वा स्मृती महोत्सव व सर्व संत स्मृती मानवता दिन निमित्त ग्रामगीता प्रवचन सप्ताहाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात २४ डिसेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत करण्यात आले असून त्यामध्ये श्री गुरुदेव संस्कार शिबिराचे आयोजन केले असून सकाळी पाच वाजता आदर्श दिनचर्या सुरुवात होऊन सकाळी उठणे सामुदायिक ध्यान, प्राणायाम, योगा, मल्लखांब, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, व्यसने भारतीय संस्कृती थोर संतांचे कार्य, इत्यादी विषय बौद्धिक तासाच्या माध्यमातून शिकविले जातात मुलांना बौद्धिक खेळ खेळल्या जात आहे. त्यामुळे त्यांच्या बुद्धीमध्ये वाढ होत आहे सायंकाळी सामुदायिक प्रार्थना, रात्री कथाकथन व राष्ट्र वंदना घेतली जात आहे. या सर्व गोष्टीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कार पेरणीचे काम संस्कार शिबिरच्या माध्यमातून ग्रामगीताचार्य रायजीप्रभू शेलोटकर महाराज करीत असून यांच्यासह दापोरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मंडळाचे पदाधिकारी मेहनत घेऊन विद्यार्थ्यांना विविध विषयाचे ज्ञान देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे म्हणून आज सुसंस्कार शिबिर काळाची गरज बनले आहे.



आजचा बालक उद्याचे तरुण कार्यकर्ते होतील गावाचा देशाचा पांग फेडतील उत्तम गुणांनी या कलियुगाच्या काळात आजचा तरुण मोबाईल टीव्ही च्या नादात दिशाहीन झालेला आहे, त्यामुळे त्याच्या मनावर सतत कुसंस्कार पडत असून आज समाजात चोरी व्यसनाधीनता बलात्काराचे प्रमाण वाढत आहे मुले आई-वडिलांचे ऐकत नाही. आजचे अनेक तरुण वाईट व्यसनांच्या नादी लागल्याचे दिसत असून त्या तरुणाला दिशा द्यायची असेल तर आज राष्ट्रसंतांना अभिप्रेत असलेला तरुण जो निर्व्यसनी असेल, राष्ट्रप्रेमी असेल शरीराने धडधाकट घडवायचा असेल तर आज सुसंस्कार शिबिरातूनच तो विद्यार्थी घडते. कारण सुसंस्कार शिबिरामध्ये आदर्श दिनचर्या असते विविध विषयाचे बौद्धिक दिले जाते. त्यामुळे विद्यार्थी मनावर चांगले संस्कार होते बंधुप्रेम, आई- वडिलांची सेवा गाडगे बाबांची दशसुत्री, राष्ट्रभक्ती राष्ट्रप्रेम, नैतिक मूल्य, भगवद्गीता ग्रामगीता, रामायण, इत्यादी ग्रंथाचा अभ्यास सुसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विविध गोष्टीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविला जातो. आदर्श थोर पुरुषांचे चरित्र, संतांचे चरित्र विद्यार्थ्यांच्या बालमनावर परिणाम करून जातात म्हणून आज संस्कार शिबिराची काळाची गरज आहे. असे प्रतिपादन ग्रामगीताचार्य रायजीप्रभू शेलोटकर महाराज यांनी केले.